20949

(NMEO : मार्गदर्शक सूचना)

जा.क्र.विप्र.२/रा.खा.ते.अभियान NMEO/मा.सू.२२-२३/प्र.क्र. -/२२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, पुणे -४११००५,
ईमेल : nmoopdda@gmail.com, दिनांक :४/०६/२०२२

प्रति,

१) विभागीय कृषि सह संचालक (सर्व संबंधीत)

२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व संबंधीत)

**विषय : राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (National Mision on Edible Oil: NMEO) सन २०२२-२३ अंतर्गत कार्यक्रम अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना.....**

संदर्भ :१) केंद्र शासनाने ऑगस्ट २०१८ मध्ये NFSM च्या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेल्या Re-vamped: NFSM- Operation Guideline: Part-III (NFSM Oilseed & Oilpalm)
२) केंद्र शासनाचे पत्र F.No. २-१४/२०२२NFSM-Oilseeds, दि. २५ मे, २०२२
३) शासन निर्णय क्र. राअसुअ-२०२२/प्र.क्र.५०/४-अे, दि. ०२ जून, २०२२

सन २०२२-२३ पासून केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (गळीतधान्य व तेलताड) चा अंतर्भाव राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (National Mission on Edible Oil-NMEO) मध्ये केला आहे. याअंतर्गत खालील तीन अभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे,

१) अभियान क्र. १ (गळीतधान्य पिके)
२) अभियान क्र. ३ (वृक्षजन्य तेलबिया पिके)
३) विशेष अभियान (TRFA)- भातपड क्षेत्रामध्ये गळीतधान्य उत्पादन वाढ

केंद्र शासनाच्या सूचनानुसार सन २०२२-२३ वर्षाकरीता अभियान क्र.१ व ३ साठी वार्षिक कृती आराखडे केंद्र शासनास प्रस्तावित करण्यात आले होते. त्यापैकी केंद शासनाने संदर्भीय दि. २५ मे, २०२२ चा पत्रान्वये व राज्य शासनाने संदर्भीय दि. ०२ जून, २०२२ च्या शासन निर्णयान्वये अभियान क्र.१ (गळीतधान्य) साठी रु. ५९८३.३३ लाखाच्या (केंद्र हिस्सा रु. ३६५४.०० लाख व राज्य हिस्सा रु. २३२९.३३ लाख) वार्षिक कृती आराखड्यास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. अभियान क्र. ३ साठी केंद्र शासनाची प्रशासकीय मान्यता प्रतीक्षाधिन आहे.

सदर अभियानाच्या कार्यकारी मार्गदर्शक सुचना केंद्र शासनाने संदर्भ क्र. १ अन्वये निर्गमित केलेल्या असून सदर कार्यकारी मार्गदर्शक सुचना केंद्र शासनाच्या www.nfsm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यानुसार राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (NMEO) अंतर्गत अभियान क्र.१ व ३ साठीच्या मार्गदर्शक सूचना व अभियान क्र. १ चा जिल्हा / बाबनिहाय कार्यक्रम सोबत सहपत्रीत केला आहे. अभियान क्र.३ चा जिल्हा / बाबनिहाय कार्यक्रम व विशेष अभियान (भातपड क्षेत्रामध्ये गळीतधान्य उत्पादन कार्यक्रम : TRFA) च्या मार्गदर्शक सूचना व जिल्हा / बाबनिहाय कार्यक्रम आपणास केंद्र शासनाच्या मंजुरीनंतर स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

सदर मार्गदर्शक सुचना कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (http://www.krishi.maharashtra.gov.in) प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी तालुकानिहाय लक्षांक निर्धारीत करुन क्षेत्रिय स्तरावर अभियानाची तात्काळ अंमलबजावणी करावी.

सोबत :- वरीलप्रमाणे
(पृष्ठे संख्या १ ते ३२)

(विकास पाटील)
अभियान संचालक तथा
कृषि संचालक (वि.प्र.)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत : १) मा.प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२ यांना माहीतीस्तव सविनय सादर.
२) मा. जिल्हाधिकारी (सर्व संबंधित) यांना माहीतीस्तव सविनय सादर.

पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव समादाराने अग्रेषित
१) मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, महाबीज भवन, अकोला.
२) मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, प्रभादेवी, राजन हाऊस, मुंबई.
३) क्षेत्रीय व्यवस्थापक, राष्ट्रीय बियाणे महामंडळ (NSC), ६८१-६९०, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७.

**वाचा :** १. केंद्र शासनाच्या रा.अ.सु.अ.(गळीत व तेलताड) बाबत सुधारीत कार्यकारी मार्गदर्शक सूचना २०१८-१९ व २०१९-२०
२. शासन निर्णय क्रमांक डीसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का. १४१७,मंत्रालय, मुंबई, दि. ०५ डिसेंबर, २०१६ (PFMS)
३. शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-२०१६/प्र.क्र.३०१/११- अे, मंत्रालय, मुंबई, दि.२१ जानेवारी, २०१७ (DBT)
४. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७- अे, मंत्रालय, मुंबई, दि.१९ एप्रिल, २०१७ व १२ सप्टेंबर, २०१७ (DBT)
५. शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-२०१६/प्र.क्र.३०१/११- अे, दि.२८ एप्रिल, २०१७ (DBT)
६. शासन निर्णय कृषि व प.दु.म. विभाग क्र. पीएफएम २०१७ /प्र.क्र.४ ५/१७/२ अे,दि. २७ सप्टेबर, २०१७ (नियोजन)
७. शासन निर्णय कृषि व प.दु.म. विभाग क्र. ०४१८/प्र.क्र.१५५/१४ए,दि.२७ एप्रिल, २०१८ (उ.शे.स.शे.)
८. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १६१७/प्र.क्र.३१ (भाग २) /१८/१७- अे, मुंबई, दि. ०४ जानेवारी, २०१९ (DBT)
९. शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-०९१९/प्र.क्र.२२१/१४-अे, दिनांक ०४ नोव्हेंबर,२०२०
१० आयुक्तालयाच्या शेतीशाळाबाबत मा.सु. जा.क्र. वि.प्र.७/शेतीशाळा/ १७०७९/१९, दि. ६ मे, २०२२ व १८६०२/ २३ मे, २०२२
११. शासन पत्र क्र. राअसुअ- २०२२/प्र.क्र.१९/४-अे, दि. २६ एप्रिल २०२२ (SFSMEC बैठकीचे इतिवृत्त)
१२. केंद्र शासनाचे इंग्रजी पत्र F.No.२-१४/२०२२ NFSM-Oilseeds, दि. २५ मे, २०२२ (प्रशासकीय मान्यता-केंद्र शासन)
१३. शासन निर्णय क्र. अेअेपी-२०२२/प्र.क्र.५०/४-अे, दि.०२ जून, २०२२ (प्रशासकीय मान्यता-राज्य शासन)

**सन २०२२-२०२३ :राष्ट्रीय खाद्य तेल अभियान**

(NFSM-Oilseeds and Oil Palm subsumed as National Mission on Edible Oil-NMEO)

# अंमलबजावणी बाबत मार्गदर्शक सुचना

**प्रस्तावना :**

सन २०१४-१५ पासुन राज्यात केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय गळीतधान्य आणि तेलताड अभियानाची (NMOOP) अंमलबजावणी करण्यात येत असून सन २०१८-१९ पासून केंद्र शासनाने सदर अभियान रा.अ.सु.अभियानांतर्गत गळीतधान्य आणि तेलताड अभियान म्हणून अंर्तभूत केले होते. **सन २०२२-२३ पासून केंद्र शासनाने सदर अभियानाचा राष्ट्रीय खाद्य तेल अभियानांतर्गत समावेश केलेला असून** अभियानाच्या सुधारीत कार्यकारी मार्गदर्शक सुचना *(www.nfsm.gov.in)* या केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर व कृषी विभागाच्या *(http://www.krishi.maharashtra.gov.in)* संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्या असून त्यानुसार अभियानाची अंमलबजावणी करावयाची आहे.

सन २०२२-२३ मध्ये सदर अभियानांतर्गत राज्यात खालील तीन अभियानांची अंमलबजावणी करावयाची आहे,

**अभियान क्र. १ (गळीतधान्य पिके):** सदर अभियानात सोयाबीन, भुईमुग, तीळ, सुर्यफुल, करडई, जवस व मोहरी या प्रमुख गळीतधान्य पिकांचा अंतर्भाव आहे. पायाभूत व प्रमाणित बियाणे उत्पादन, प्रमाणित बियाणे पुरवठा, प्रात्यक्षिके व प्रशिक्षण याद्वारे तंत्रज्ञान प्रसार, अनुदानीत दराने कृषि निविष्ठा, सुधारीत कृषि औजारे, सिंचन सुविधाचा पुरवठा व फ्लेक्झी फंड या घटकांचा सदर अभियानात समावेश आहे.

❖ पायाभूत बियाणे उत्पादनासाठी मुलभूत बियाणे खरेदी ही बाब विशेष कार्यक्रम म्हणून सदर अभियानात अंर्तभूत करण्यात आलेली आहे.

**अभियान क्र. ३ (वृक्षजन्य तेलबिया पिके) :** सदर अभियानात करंज, महुआ व कोकम या वृक्षजन्य तेलबिया पिकांचा समावेश असून सदर पीकांच्या क्षेत्रवृध्दीसाठी पाणलोट व पडीक क्षेत्रावर लागवड व तद्नंतर देखभाल करणे अपेक्षीत आहे. या अभियानांतर्गत क्षेत्रविस्तार, रोपवाटीका निर्मीती, लागवडीनंतर दुस-या वर्षापासुन फळधारणेपर्यंत देखभाल, तंत्रज्ञान प्रसार व फ्लेक्झी फंड या घटकांचा समावेश आहे.

**विशेष अभियान (TRFA)- भातपड क्षेत्रामध्ये गळीतधान्य उत्पादन वाढ:** सदर अभियानात भुईमुग, करडई, जवस व मोहरी या प्रमुख गळीतधान्य पिकांचा अंतर्भाव आहे. प्रात्यक्षिके व प्रशिक्षण याद्वारे तंत्रज्ञान प्रसार, एकात्मिक अन्नद्रव्ये व्यवस्थापन, अनुदानीत दराने कृषि निविष्ठा, सुधारीत कृषि औजारे व सिंचन सुविधाचा पुरवठा या घटकांचा सदर अभियानात समावेश आहे

**राज्य अन्न सुरक्षा अभियान कार्यकारी समिती ( SFSMEC) :**

अभियान अंमलबजावणीसाठी शासन निर्णय दि.१९/५/२०१४ अन्वये मा. प्रधान सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली **राज्य अन्न सुरक्षा अभियान कार्यकारी समिती** गठीत करण्यात आली आहे.

**समितीची कार्यकक्षा:** राज्यस्तरीय वार्षिक कृती आराखडयास मंजुरी देणे, अभियान अंमलबजावणीच्या अनुषंगाने आढावा घेणे व मार्गदर्शन करणे, आवश्यकतेप्रमाणे बाबबदलास मंजुरी देणे.

राष्ट्रीय खाद्य तेल अभियानांतर्गत व TRFA अभियानातंर्गत घटकनिहाय कार्यक्रम पुढील तक्त्यात दर्शविला आहे.

**सन २०२२-२३ रा.खा.ते.अभियान अंतर्गत अभियान क्र. १ (गळीतधान्य) : घटकनिहाय आर्थिक मापदंड**

| अ.क्र | घटक / बाब | अनुदानाचा दर | अनुदान पात्रतेचे निकष |
|---|---|---|---|
| **अ) प्रमुख घटक - बियाणे** | | | |
| अ १ | पायाभूत बियाणे उत्पादन | राज्यासाठी अधिसुचीत वाणांचे उत्पादीत पायाभूत बियाणासाठी उच्चतम मर्यादा **रु.२५००/क्वि.** | महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेच्या मुक्तता अहवालानुसार राज्यांतर्गत प्रत्यक्षात उत्पादीत केलेल्या पायाभूत व प्रमाणित बियाणेकरिता मागील १० वर्षाचे आतील राज्यासाठी अधिसुचीत झालेल्या वाणांचे प्रत्यक्षात उत्पादीत पायाभूत व प्रमाणित बियाणासाठी **उत्पादनाच्या समप्रमाणात** किंवा उच्चतम रु.२५००/क्वि. प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. तसेच, ५ वर्षातील वाणांच्या बियाणे उत्पादनासाठी रु.१००/क्वि. पूरक अनुदान अनुज्ञेय राहील. |
| अ २ | प्रमाणित बियाणे उत्पादन | राज्यासाठी अधिसुचीत वाणांचे उत्पादीत प्रमाणित बियाणासाठी **उच्चतम मर्यादा रु.२५००/क्वि.** | |
| अ ३ | प्रमाणित बियाणे वितरण | किमतीच्या ५०% किंवा उच्चतम मर्यादा सुधारीत वाणासाठी **रु.४०००/क्वि.** | मागील १५ वर्षातील राज्यासाठी अधिसुचीत वाणांच्या प्रमाणित बियाणे वितरणासाठी अनुदान अनुज्ञेय राहील. |
| **ब) प्रमुख घटक - तंत्रज्ञान प्रसारण** | | | |
| ब १ | गट प्रात्याक्षिके<br>**(शेतकरी शेतीशाळा संलग्न)** | निर्धारित प्रात्यक्षिक तंत्रज्ञान पॅकेज प्रमाणे पीकनिहाय उच्चतम मर्यादा<br>सोयाबीन रु.६०००/हे.<br>करडई रु.३०००/हे.<br>जवस रु.३०००/हे<br>मोहरी रु.३०००/हे<br>सुर्यफुल रु.३०००/हे<br>भुईमुग रु. १००००/हे. | विभागस्तरावर संलग्न कृषि विद्यापीठांच्या सल्ल्याने जिल्हानिहाय व पीकनिहाय प्रात्यक्षिक तंत्रज्ञान पॅकेज तयार करावीत. पिक प्रात्यक्षिकांसाठी सर्व निविष्ठा घटक पुरवठ्याकरीता सदर पीकासाठी दर्शविलेल्या उच्चतम मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. रासायनिक खतावरील खर्च लाभार्थी शेतकऱ्याने स्वतः करावयाचा आहे यासाठी अनुदान देय नाही. |
| ब २ | आय.पी.एम. शेतकरी शेतीशाळा<br>**(शेतकरी शेतीशाळा संलग्न)** | एकूण ₹ १२५००/- प्रती प्रशिक्षण (शेतीशाळा मार्गदर्शक सूचनांप्रमाणे) | Cropsap-शेतीशाळाच्या संदर्भीय दि. ०६/०५/२२ च्या मा. सु. धर्तीवर |
| ब ३ | शेतकरी प्रशिक्षण | रु. २४०००/प्रशिक्षण प्रमाणे | ३० शेतक-यांच्या समुहासाठी २ दिवसांकरीता |
| ब ४ | अधिकारी प्रशिक्षण | रु.३६,०००/प्रशिक्षण प्रमाणे | २० कर्मचारी समूहासाठी २ दिवसांकरीता |
| **क) प्रमुख घटक - उत्पादन वाढीसाठी निविष्ठा व औजारे व सिंचन सुविधा (कृषि यांत्रीकीकरण उपभियान प्रमाणे अनुदान मर्यादा)** | | | |
| क १ | जिप्सम,चुनखडी, गंधक | उच्चतम मर्यादा रु. ७५०/हे. | उत्पादन वाढीसाठी कृषि निविष्ठा किमतीच्या ५० टक्के किंवा शेजारच्या रकान्यात निविष्ठेसमोर दर्शविल्याप्रमाणे अनुदान दराची उच्चतम मर्यादा यापैकी किमानप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. शेतकरी शेतीशाळा संलग्न राबवावा. |
| क २ | जैविक खतांचा वापर | उच्चतम मर्यादा रु. ३००/हे. | |
| क ३ | कीडनाशके/तणनाशके | उच्चतम मर्यादा रु. ५००/हे. | |
| क ४ | एन. पी. व्ही.चा वापर | उच्चतम मर्यादा रु. ५००/हे. | |
| क ५ | पॉवर ऑपरेटेड कृषि औजारे<br>**(कृषि यांत्रिकीकरण उपअभियान मार्गदर्शक सुचनांप्रमाणे)** | सर्वसाधारण प्रवर्ग - किमतीच्या ४०% व अनु.जाती/ अनु. जमाती, अल्प, अत्यल्प भूधारक, महिला प्रवर्ग किमतीच्या ५०% किंवा औजाराच्या उच्चतम अनुदान मर्यादेत | उन्नत शेती-समृध्द शेतकरी मोहिमेत समाविष्ठ व कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रवर्गनिहाय व औजारेनिहाय उच्चतम मर्यादेचे अधिन राहून अनुदाचा लाभ अनुज्ञेय राहील. कृ.यां. उपभियान प्रमाणे उच्चतम अनुदान मर्यादा लागू राहील. |
| क ६ | पाईप्स पुरवठा | किमतीच्या ५०% किंवा उच्चतम मर्यादा रु. १५००० प्रती लाभार्थी मर्यादेत | पाईप्सच्या प्रकारानुसार अनुदान दर वेगवेगळा आहे. (रु.५०/- प्रती मीटर एच.डी.पी.ई.पाईप, रु.३५/- प्रती मीटर पी.व्ही.सी. पाईप व रु. २०/- प्रती मीटर एच.डी.पी.ई. लॅमीनेटेड पाईप) |
| **ड) प्रमुख घटक :** फ्लेक्झी फंड | | | |
| ड १ | छोटे तेलघाणा सयंत्र | किमतीच्या ५०% किंवा उच्चतम मर्यादा रु. १,८०,००० /- प्रती यंत्र | कृषि यांत्रिकीकरण उपअभियान मार्गदर्शक सुचनांप्रमाणे उच्चतम अनुदान मर्यादा लागू राहील. |
| ड २ | डिझेल / विद्युत पंपसंच | किमतीच्या ५०% किंवा उच्चतम मर्यादा रु. १०,००० प्रती पंप | पाण्याचा स्त्रोत उपलब्ध असणाऱ्या शेतक-यांना अनुदान अनुज्ञेय राहील. |
| ड ३ | शेततळे | खर्चाच्या ५०% किंवा उच्चतम मर्यादा रु. ७५ ,००० प्रती शेततळे | वैयक्तिक लाभार्थीकरिता अनुदान अनुज्ञेय राहील. |
| ड ४ | गोदाम उभारणी | खर्चाच्या ५०% किंवा उच्चतम मर्यादा रु. १२.५०लाख / २५० मे. टन क्षमता | FPO / FPC/शेतकरी गट यांना अनुदान अनुज्ञेय राहील. |
| **इ) प्र.घ. : प्रकल्प व्यवस्थापन खर्च** | | -- | क्रॉप कटींग, कंत्राटी कर्मचारी मानधनव आकस्मिक खर्चासाठी |

विशेष कार्यक्रम

| अ.क्र | घटक / बाब | अनुदानाचा दर | अनुदान पात्रतेचे निकष |
|---|---|---|---|
| १ | मुलभूत बियाणे खरेदी | भारतीय कृषि अनुसंधान परिषद (ICAR) यांनी निर्धारीत केलेल्या दराने मुलभूत बियाणे खरेदीची संपूर्ण रक्कम प्रतिपूर्ती स्वरूपात | मागील १० वर्षातील राज्यासाठी अधिसुचीत सुधारित व संकरित वाणांचे मुलभूत बियाणे निर्धारीत दराने खरेदीची संपूर्ण अनुदानाची रक्कम प्रतिपूर्ती स्वरुपात निधी उपलब्धतेच्या मर्यादेत अनुज्ञेय राहील. |

## रा.खा.ते.अभियान अंतर्गत अभियानक्र. ३ (वृक्षजन्य तेलबिया) : घटकनिहाय आर्थिक मापदंड संक्षिप्त तपशील

| अ.क्र | घटक / बाब | अनुदानाचा दर | अनुदान पात्रतेचे निकष |
|---|---|---|---|
| **अ. प्रमुख घटक - क्षेत्रविस्तार लागवड** | | | |
| अ १ | करंज वृक्ष | रु.२०,०००/हे. प्रमाणे | वृक्ष लागवडीसाठी १ हे. करीता पिकनिहाय दर्शविल्याप्रमाणे उच्चतम अनुदान मर्यादेत अनुज्ञेय राहील. |
| अ २ | कोकम वृक्ष | रु.१५,०००/ हे. प्रमाणे | |
| अ ३ | महुआ वृक्ष | रु.१५,०००/ हे. प्रमाणे | |
| **ब. प्रमुख घटक - क्षेत्रविस्तार व लागवडीनंतर देखभाल** | | | |
| ब १ | करंज वृक्ष (४ वर्षे) | रु.२०००/ हे. प्रमाणे | लागवडीनंतर १ वर्षाच्या कालावधीपासून पुढील निर्धारित कालावधीपर्यंत देखभालीसाठी प्रतिवर्ष उच्चतम अनुदान मर्यादेत अनुज्ञेय राहील. |
| ब २ | कोकम वृक्ष (६ वर्षे) | रु.२०००/ हे. प्रमाणे | |
| ब ३ | महुआ वृक्ष (८ वर्षे) | रु.२०००/ हे. प्रमाणे | |
| **क. प्रमुख घटक - तंत्रज्ञान प्रसारण घटक** | | | |
| क १ | जिल्हा स्तर शेतकरी प्रशिक्षण | रु.२४,०००/- प्रती प्रशिक्षण | शेतकरी व निविष्ठा विक्रेते ३० प्रशिक्षणार्थींच्या समुहासाठी २ दिवसांकरीता |
| क २ | विभागस्तर कर्मचारी प्रशिक्षण | रु.३६,०००/- प्रती प्रशिक्षण | २० कर्मचारी समूहासाठी २ दिवसांकरीता |
| **ड. प्रमुख घटक - फ्लेक्झीनिधी (गरजेनुरुप उपक्रम)** | | | |
| ड १ | शेततळे | खर्चाच्या ५०% किंवा उच्चतम मर्यादा रु. ७५ ,००० प्रती शेततळे | वैयक्तिक लाभार्थीकरिता अनुदान अनुज्ञेय राहील. |
| ड २ | डिझेल / विद्युत पंपसंच | किमतीच्या ५०% किंवा उच्चतम मर्यादा रु. १०,००० प्रती पंप | पाण्याचा स्रोत उपलब्ध असणाऱ्या शेतक-यांना अनुदान अनुज्ञेय राहील. |
| **इ. प्रमुख घटक - व्यवस्थापन व आकस्मिक खर्च** | | | अनुषंगीक आकस्मिक खर्चासाठी |

## रा.खा.ते.अभियान अंतर्गत विशेष अभियान (TRFA) : घटकनिहाय आर्थिक मापदंड संक्षिप्त तपशील

| अ.क्र | घटक / बाब | अनुदानाचा दर | अनुदान पात्रतेचे निकष |
|---|---|---|---|
| **अ) प्रमुख घटक- तंत्रज्ञान प्रसारण** | | | |
| अ १ | गट प्रात्याक्षिके | निर्धारित प्रात्यक्षिक तंत्रज्ञान पॅकेज प्रमाणे पीकनिहाय उच्चतम मर्यादा<br>करडई रु.३०००/हे.<br>जवस रु.३०००/हे<br>मोहरी रु.३०००/हे<br>सुर्यफुल रु.३०००/हे<br>भुईमुग रु. रु. १००००/हे. | विभागस्तरावर संलग्न कृषि विद्यापीठांच्या सल्ल्याने जिल्हानिहाय व पीकनिहाय प्रात्यक्षिक तंत्रज्ञान पॅकेज तयार करावीत. पिक प्रात्यक्षिकांसाठी सर्व निविष्ठा घटक पुरवठ्याकरीता सदर पीकासाठी दर्शविलेल्या उच्चतम मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. रासायनिक खतावरील खर्च लाभार्थी शेतकऱ्याने स्वतः करावयाचा आहे यासाठी अनुदान देय नाही. |
| अ २ | शेतकरी प्रशिक्षण | रु. २४०००/प्रशिक्षण प्रमाणे | ३० शेतक-यांच्या समुहासाठी २ दिवसांकरीता |
| अ ३ | अधिकारी प्रशिक्षण | रु.३६,०००/प्रशिक्षण प्रमाणे | २० कर्मचारी समूहासाठी २ दिवसांकरीता |
| **ब) प्रमुख घटक - उत्पादन वाढीसाठी निविष्ठा व औजारे व सिंचन सुविधा (कृषि यांत्रीकीकरण उपभियान प्रमाणे अनुदान मर्यादा)** | | | |
| ब १ | जिप्सम,चुनखडी, पायराईट, गंधक | उच्चतम मर्यादा रु. ७५०/हे. | उत्पादन वाढीसाठी कृषि निविष्ठा किंमतीच्या ५० टक्के किंवा शेजारच्या रकान्यात निविष्ठेसमोर दर्शविल्याप्रमाणे अनुदान दराची उच्चतम मर्यादा यापैकी किमानप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. शेतकरी शेतीशाळा संलग्न राबवावा. |
| ब २ | रायझोबियम / पीएसबी वापर | उच्चतम मर्यादा रु. ३००/हे. | |
| ब ३ | कीडनाशके/तणनाशके / सूक्ष्म मुलद्रव्य वापर | उच्चतम मर्यादा रु. ५००/हे. | |
| ब ४ | एन. पी. व्ही.चा वापर | उच्चतम मर्यादा रु. ५००/हे. | |
| ब ५ | पॉवर ऑपरेटेड कृषि औजारे **(कृषि यांत्रिकीकरण उपअभियान मार्गदर्शक सुचनांप्रमाणे)** | सर्वसाधारण प्रवर्ग - किमतीच्या ४०% व अनु.जाती/ अनु. जमाती, अल्प, अत्यल्प भूधारक, महिला प्रवर्ग किमतीच्या ५०% किंवा औजाराच्या उच्चतम अनुदान मर्यादेत | उन्नत शेती-समृध्द शेतकरी मोहिमेत समाविष्ठ व कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रवर्गनिहाय व औजारेनिहाय उच्चतम मर्यादेचे अधिन राहून अनुदाचा लाभ अनुज्ञेय राहील. कृ.यां. उपभियान प्रमाणे उच्चतम अनुदान मर्यादा लागू राहील. |
| ब ६ | पाईप्स पुरवठा | किमतीच्या ५०% किंवा उच्चतम मर्यादा रु. १५००० प्रती लाभार्थी मर्यादेत | पाईप्सच्या प्रकारानुसार अनुदान दर वेगवेगळा आहे. (रु.५०/- प्रती मीटर एच.डी.पी.ई.पाईप, रु.३५/- प्रती मीटर पी.व्ही.सी. पाईप व रु. २०/- प्रती मीटर एच.डी.पी.ई. लॅमीनेटेड पाईप) |

**संदर्भ क्र. ८** चे शासन निर्णयान्वये “लाभार्थी शेतकऱ्यांनी कृषि निविष्ठांची खरेदी अधिकृत विक्रेत्यांकडून कॅशलेस पद्धतीने किंवा रोखीने करावी. लाभार्थी शेतकऱ्याने वस्तू व सेवा कर (GST) क्रमांक असलेली खरेदी पावती सादर करणे बंधनकारक राहील. तसेच, एका लाभार्थी शेतकऱ्यास एका वर्षात सर्व बाबी मिळून एकूण जास्तीत जास्त ५ हेक्टर पर्यंत लाभ घेता येईल.

## अभियान नियंत्रण अधिका-यांची नेमणूक:

क्षेत्रीय स्तरावर खालील प्रमाणे अभियान नियंत्रण अधिकारी व आहरण संवितरण अधिका-यांची नेमणूक करणे बाबत शासनास प्रस्तावित केले आहे.

| अ.क्र. | स्तर | अभियान नियंत्रण अधिकारी | आहरण व संवितरण अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | आयुक्तालय | आयुक्त (कृषि), पुणे | सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय |
| २ | विभाग | संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक | वि.कृ.स.सं.कार्यालयातील लेखा अधिकारी |
| ३ | जिल्हा | संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | जि.अ.कृ.अ.कार्यालयातील लेखा अधिकारी |

संदर्भीय दि.२७/९/२०१७ च्या शासन निर्णयानुसार अभियानाची अंमलबजावणी सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे (PFMS) करून वैयक्तिक लाभार्थ्यांच्या अनुदानाची रक्कम डीबीटीद्वारे त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर पीएफएमएस प्रणालीद्वारे जमा करावी.

## अभियानांतर्गत समाविष्ठ घटक व सनियंत्रण स्तर:

| अ. क्र. | घटक | घटकांतर्गत समाविष्ठ बाबी | सनियंत्रण स्तर |
|---|---|---|---|
| १ | बियाणे घटक | बियाणे मिनीकीट्स, मुलभूत बियाणे खरेदी अनुदान | आयुक्तालय स्तर |
| | | बियाणे मिनीकीट्स, पायाभुत बियाणे उत्पादन, प्रमाणित बियाण उत्पादन, प्रमाणित बियाणे वितरण | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी |
| २ | तंत्रज्ञान प्रसार | गट प्रात्यक्षिके, शेतकरी/ विस्तार अधिकारी प्रशिक्षण | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी |
| ३ | निविष्ठा घटक | निविष्ठा, कृषि औजारे, पाईप्स पुरवठा | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी |
| ४ | फ्लेक्झी फंड घटक | छोटे तेलघाणा सयंत्र, डिझेल / विद्युत पंपसंच, शेततळे व गोदाम उभारणी | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी |
| ५ | क्षेत्रविस्तार | लागवड व लागवडीनंतर देखभाल | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी |
| ६ | प्रकल्प व्यवस्थापन | मानधन, भाडे तत्वावर वाहन व संकीर्ण | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी |

**महाडीबीटी प्रणाली व्यतिरिक्त अन्य आवश्यक बाबीसाठी लाभार्थीची निवडीचे सर्वसाधारण निकष:**

१. शेतकरी उत्पादक गटांची प्रथम प्राधान्याने निवड करावी. निवडलेल्या गावात नोंदणीकृत शेतकरी उत्पादक गट नसल्यास नव्याने गटनिर्मीती करुन आत्मा संस्थेकडे गटाची नोंदणी करावी.

२. नोंदणीकृत गटातील शेतक-याचे स्वतःचे नावे ७/१२ व ८/अ उतारा असणे बंधनकारक राहील.

३. अनुसुचित जाती/जमाती मधील लाभधारकांनी जातीचा स्वयंसाक्षांकीत वैध दाखला अर्जासोबत जोडावा.

४. कृषि सहाय्यकाने लाभार्थी निवड पंचायतराज संस्थेच्या सहभागाने करावी. मंडळ कृषि अधिकारी यांनी निकषांनुसार तपासुन लाभार्थी निवडीस अंतीम मान्यता दयावी व लाभार्थी यादी तालुका कार्यालय/ पंचायत समिती/ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावावी. तसेच, सन २०२२-२३ मध्ये वैयक्तिक लाभ दिलेल्या लाभधारकांची यादी नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी.

५. विहीत प्रमाणानुसार अनु. जाती/जमाती प्रवर्गाचे लाभार्थी, ३० टक्के महिला व ५ टक्के दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ द्यावा.

६. जेथे शेतकरी गटामध्ये पुरेश्या प्रमाणात अनुसूचीत जाती/जमाती प्रवर्गातील शेतकरी नसतील तेथे अनुसूचीत जाती/जमाती प्रवर्गातील शेतक-यांची यादी तयार करुन निवड करावयाच्या संख्येएवढ्या प्रमाणात सोडत पध्दतीने निवड प्रक्रिया सर्वासमक्ष पार पाडावी.

७. लाभार्थी शेतकरी मासिकाचा वर्गणीदार नसल्यास वर्गणीदार होण्यासाठी उद्युक्त करावे.

८. उपविभाग व जिल्हास्तरावरुन या प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे सनियत्रण करावे.

## अ) अभियान क्र. १ - गळीतधान्य अभियान :

सदर अभियानाअंतर्गत तेलबिया पिकांखालील क्षेत्र व उत्पादकता वाढीचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१. नविन वाणांच्या प्रचार व प्रसारावर विशेष भर देऊन बियाणे बदलाचे दरात वृध्दी करणे.

२. गळीतधान्य पिकांखालील सिंचित क्षेत्रात वृध्दी करणे.

३. कमी उत्पादकता असणा-या पिकांखालील क्षेत्र गळीतधान्य पिकाखाली आणणे.

४. तृणधान्ये/कडधान्ये/ऊस पिकात आंतरपीकाव्दारे गळीतधान्य पिकांखालील क्षेत्रात वाढ करणे.

५. भात/बटाटा पिकांच्या काढणीनंतर पडीक राहणा-या क्षेत्रावर गळीतधान्य पिके घेऊन क्षेत्र विस्तार करणे.

**अभियान-१ (गळीतधान्य) चा जिल्हा व घटकनिहाय कार्यक्रम प्रपत्र क्र. १ मध्ये दर्शविला आहे.**

**समाविष्ठ पिके व निवडण्यांत आलेले जिल्हे :**

केंद्र शासनाच्या सुचनांनुसार ज्या जिल्हयांचे गळीतधान्य पिकांखालील क्षेत्र जास्त पण तुलनेत उत्पादकता कमी आहे असे जिल्हे उत्पादकता वाढीसाठी व ज्या जिल्हयांचे क्षेत्र कमी मात्र उत्पादकता जास्त आहे असे जिल्हे क्षेत्र विस्ताराचे दृष्टीने या अभियानाअंतर्गत निवडलेले आहेत.

**अभियान-१ (गळीतधान्य) अंतर्गत पिकनिहाय निवडलेले जिल्हयांचा तपशील**

| क्र. | पिक | जिल्हे | जिल्ह्यांचे नाव |
|---|---|---|---|
| १ | गळीतधान्य पिके | १९ | नाशिक, धुळे, अहमदनगर, पुणे, सांगली, बीड, लातुर, उस्मानाबाद, नांदेड, हिंगोली, परभणी, बुलडाणा, अकोला, अमरावती, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपुर, चंद्रपुर |

**क्षेत्र निवड**:: जि.अ.कृ.अ. यांनी क्षेत्र निवड करतांना जिल्ह्यातील पिकाखाली व्याप्त क्षेत्र लक्षात घेवून ज्या तालुक्यांत पिकाचे क्षेत्र जास्त आहे परंतु उत्पादकता सरासरीपेक्षा कमी आहे अशा तालुक्यांची उत्पादकता वाढीसाठी व ज्या तालुक्यात क्षेत्र कमी आहे मात्र उत्पादकता सरासरीपेक्षा जास्त आहे त्यांची क्षेत्र वृध्दीसाठी प्राधान्याने निवड करावी. जेथे क्षेत्र व उत्पादकता वाढीस वाव आहे अशा क्षेत्राची कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी निश्चिती करावी. जिल्हास्तरावरून तालुकानिहाय पिक उत्पादकता निर्धारित करण्याची कार्यवाही करून उत्पादकता लक्षांक ठरवून द्यावेत. नविन क्षेत्र आणि शेतकरी गटांना संधी मिळण्यासाठी शक्यतो मागील वर्षीचे क्षेत्र व गटांची पुन्हा निवड करु नये.

**क्षेत्र निवडीसाठी मुलभूत सर्वेक्षण:**

उत्पादन व उत्पादकता आधारीत क्षेत्र निवड करताना खालील बाबींचे मुलभुत सर्वेक्षण (प्रपत्र-१) करण्यात यावे.

- पिकनिहाय व वाणनिहाय व्याप्त क्षेत्र व वाण निहाय उत्पादकता.
- जमिन आरोग्य पत्रिकेनुसार जमीनीचा सामु, उपलब्ध नत्र, स्फुरद, पालाश व सुक्ष्ममुलद्रव्ये यांचा तपशील.
- उपलब्ध सिंचन सुविधा, सिंचित क्षेत्र व त्यापैकी गळीतधान्य पिकासाठी उपलब्ध सिंचनाचा तपशील.
- उपलब्ध टॅक्टर/पॉवर टीलर/बैल जोडी संख्या, औजारे निहाय उपलब्धता.
- पिकनिहाय निविष्ठा वापराचे प्रमाण व शिफारसी प्रमाणे मात्रा व प्रत्यक्षात वापराचा तपशील.
- उपलब्ध कुशल व अकुशल मनुष्यबळ, सर्व्हिस प्रोव्हायडरची संख्या व सेवेचा तपशील.
- निविष्ठा उपलब्धतेच्या सुविधा व तयार झालेल्या कृषि मालाची पणन व्यवस्था.
- शेतकरी गटंची निवड करुन सहभागी होण्याकरीता त्यांची संमती घेणे.

**क्षेत्र उत्पादकता आराखडा:** विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, संलग्न कृषि विद्यापीठातील तज्ञ तसेच, तालुक्यातील ज्या शेतक-यांनी सदर पिकाच्या/वाणाच्या बाबत उच्चतम उत्पादकता मिळविलेली आहे त्यांचे समन्वयाने तालुकानिहाय व पीकनिहाय उत्पादकता लक्षांक जिल्हास्तरावरुन निर्धारीत करावेत.

## ❖ रा. खा. ते. अभियान-१ (गळीतधान्य) च्या घटकनिहाय सविस्तर मार्गदर्शक सूचना:

### ➢ विशेष कार्यक्रम- पैदासकार (मुलभूत) बियाणे खरेदी

**पैदासकार (मुलभूत) बियाणे खरेदी : (केंद्र १०० टक्के हिस्सा) (केंद्र शासन स्तर)**

गळीतधान्य पिकांच्या नवीन विकसीत वाणांचे बियाणे उत्पादनासाठी बिजोत्पादन श्रृंखला विकसीत करणे हा उद्देश आहे.

**अ) अनुदानास पात्रता:** बिजोत्पादनासाठी मागील १० वर्षाचे आतील राज्यासाठी अधिसुचित केलेल्या वाणांचे पैदासकार (मुलभूत) बियाणे भारतीय कृषि अनुसंधान परिषद/कृषि विद्यापीठ (ICAR/SAU)/ केंद्र शासनाच्या मान्यता प्राप्त संस्थांकडून खरेदी करणे. सदर प्रतिपूर्ती अनुदान थेट केंद्र शासनमार्फत संबंधितांना त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्यानुसार अनुज्ञेय राहील.

**ब) अनुदान मर्यादा:** भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी मुलभूत बियाणेसाठी निर्धारीत केलेल्या दराने खरेदीची संपूर्ण रक्कम प्रतिपूर्ती स्वरुपात अनुदानास अनुज्ञेय राहील. **खरेदी केलेल्या पैदासकार बियाणाचा वापर पायाभूत बियाणे उत्पादनासाठीच करणे संबंधीतांना बंधनकारक राहील, प्रस्ताव पाठविताना वि.कृ.स.सं. यांनी त्याची खात्री करावी.**

**क) लाभार्थी:** मुलभूत बियाणापासून पायाभूत बियाणे उत्पादनासाठी कृषि विद्यापीठे, महाबीज, कृषि विज्ञान केंद्रे व ज्या नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्यांनी/इतर संस्थांनी/शेतकरी गटांनी/कृषि विज्ञान मंडळे यांना लाभ अनुज्ञेय राहील.

**ड) कालमर्यादा :** मूलभूत बियाणाच्या खरेदीचे प्रतिपूर्तीसाठीचे प्रस्ताव संबंधीत जि.अ.कृ.अ. यांनी वि.कृ.स. संचालकांचे शिफारसीने अनुज्ञेय रकमेसह सविस्तर प्रस्ताव आयुक्तालयास **खरीप हंगामासाठी दिनांक १५ ऑगस्ट पर्यंत, रब्बी हंगामासाठी १५ डिसेंबर पर्यंत आणि उन्हाळी हंगामासाठी २५ फेब्रूवारी पर्यंत सादर करण्याची दक्षता घ्यावी.**

परिपूर्ण प्रस्ताव वेळेवर सादर करण्याचे दृष्टीने जिल्ह्यातील संस्थांना आपण जाणीव करुन द्यावी. त्यासाठी जिल्ह्यातील संबंधित संस्थांनी जि.अ.कृ.अ. यांना मुलभूत बियाणापासून पायाभूत बियाणे उत्पादन कार्यक्रम घेणार असल्याबाबत वेळेवर अर्ज करून कल्पना द्यावी. उपलब्ध निधीच्या मर्यादेत व वेळेवर प्राप्त होणारे प्रस्तावच विचारात घेतले जातील, याची कृपया नोंद घ्यावी. प्राप्त प्रस्तावांच्या छाननीनंतर सदर प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात येतील. तद्नंतर अनुदानाची अनुज्ञेय रक्कम केंद्र शासन स्तरावरुन थेट संबंधीतांचे आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात जमा होईल. **दहा वर्षावरील अधिसूचीत वाणांना अनुदान अनुज्ञेय नाही, याची कृपया नोंद घ्यावी व असे प्रस्ताव शिफारसीत करू नयेत.**

**ई) पैदासकार बियाणे खरेदी प्रतिपूर्ती अनुदान प्रस्ताव सादर करण्याची कार्यपध्दती व आवश्यक अभिलेख:**

१. संस्थेच्या वैध नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, पॅन कार्डची प्रत, राष्ट्रीयकृत बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत, रद्द केलेला मुळ धनादेश व स्वस्वाक्षांकीत प्रत (आयएफएससी कोडसह) **या सर्व प्रती स्वसांक्षाकीत व ज्या कार्यालयामार्फत प्रस्ताव सादर केला आहे त्यांचे सत्यप्रती स्वाक्षांकानाने पाठवाव्यात. खरेदीबाबत मुळ इनव्हाईस तीन प्रतीत सादर करणे बंधनकारक राहील**. संस्थेकडून संबधित जि.अ.कृ.अ. यांनी परिपूर्ण प्रस्ताव तीन प्रतीत प्राप्त करून घेऊन त्यातील दोन प्रती आयुक्तालयास विहित मुदतीत सादर कराव्यात.

२. संस्थचे प्रस्तावातील पैदासकार बियाण्याचा स्त्रोत व विहित वयोमर्यादेतील वाणाची खात्री करण्याचे दृष्टीने पैदासकाराचे प्रमाणपत्राची स्वसांक्षाकीत व ज्या कार्यालयामार्फत प्रस्ताव सादर केला आहे त्यांचे सत्यप्रती स्वाक्षांकानाने प्रस्तावासोबत जोडावे.

३. पैदासकार बियाणापासून पायाभूत बियाणे उत्पादन कार्यक्रम महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणेकडे नोंद केलेल्या प्रमाणपत्राची प्रत.

५. संस्थने मूळ इनव्हाईस **तीन प्रतीत** देवून मागील बाजूस पुढीलप्रमाणे प्रमाणपत्र द्यावे.

**संस्थेने इनव्हॉईसचे मागील बाजूस द्यायचे प्रमाणपत्र**

१. प्रमाणित करण्यात येते की मे.-------------------------- संस्थेने देयकात नमूद केलेल्या मात्रेच्या मुलभूत बियाणाच्या नोंदी साठा पुस्तकात पृ क्र.------/प वर घेतल्या आहेत.

२. विहित वयोमर्यादेतील वाणांचे पैदासकार (मुलभूत) बियाणे खरेदी करुन सर्व संस्था सभासदांना व शेतक-यांना विनाशुल्क बिजोत्पादनासाठी वाटप करण्यात आले असून त्याच्या नोंदी ठेवण्यात आल्या आहेत.

३. सदरचा मुलभूत बियाणे प्रतिपूर्ती प्रस्ताव यापूर्वी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ---------- याचेकडे किंवा इतर कोणत्याही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी याचेकडे अनुदान अदायगीसाठी सादर केलेला नाही.

**दिनांक** **संस्थेचा शिक्का व सही.**

जि.अ.कृ.अ. यांनी प्रस्ताव तांत्रीक व आर्थीक दृष्ट्या तपासल्याचे अनुज्ञेय अनुदान रकमेसह खालीलप्रमाणे प्रमाणपत्र बंधनकारक व परीपूर्ण प्रस्ताव वि.कृ.स.स. यांचे मार्फत आयुक्तालयास सादर करावा.

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी द्यायचे प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते कि मे.----------- यांनी सन २०२२-२३ वर्षात ----------- पिकाचे विहित वयोमर्यादेतील वाणांचे पायाभूत बियाणे उत्पादनासाठी रु.----- रकमेचे पैदासकार (मुलभूत) बियाणे खरेदी करुन संस्था सभासदांना वाटप करण्यात आले आहे व नोंदी संस्थेच्या साठा पुस्तकात घेण्यात आल्या आहेत. प्रस्ताव तांत्रीक व आर्थीक दृष्ट्या परिपुर्ण असून अनुदान अदायगीसाठी शिफारस आहे.

दिनांक जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

**विभागीय कृषि सहसंचालक यांनी द्यायचे प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते कि मे.------------ यांचा सन २०२२-२३ साठी -----------पिकाचे विहित वयोमर्यादेतील वाणांचे पैदासकार (मुलभूत) बियाणे खरेदीचा रु.----------- रकमेचा प्रस्ताव तांत्रीक व आर्थीक दृष्ट्या परिपुर्ण असल्याने अनुदान अदायगीसाठी शिफारस करण्यात येत आहे.

दिनांक विभागीय कृषि सहसंचालक

**टीप - विहित वयोमर्यादेत नसलेल्या वाणांच्या प्रस्तावांची शिफारस करू नये.**

**अ) बियाणे घटक:**

**१) बियाणे मिनीकीट्सचा पुरवठा :**

केंद्र शासनाकडून गळितधान्ये पिकांचे नविन वाणांचा शेतक-यांमध्ये प्रसार व अवलंब होण्याच्या दृष्टीने **शेतक-यांचे शेतावर तुलनात्मक क्षेत्रीय चाचणीसाठी** बियाणे मिनीकीट्स **मोफत** पुरविण्यात येतात. याअंतर्गत केंद्र शासनाकडून सोयाबीन पिकाचे मिनीकीट ८ किलो, भुईमुग २० किलो, मोहरी/करडई २ किलो, तीळ १ किलो प्रति मिनीकीट्स पॅकीग साईज मध्ये मिनीकीट पुरविण्यात येतील. नवीन वाणांची स्वेच्छेने तुलनात्मक चाचणी घेण्यास इच्छुक असलेल्या शेतक-यांना मिनिकीट्स कार्यक्रम द्यावा.

१) बियाणे मिनीकीट प्राप्त होताच शेतक-यांना तात्काळ द्याव्यात व त्याचा पेरणीसाठी वापर करणे बंधनकारक राहील.

२) मिनिकीटचा पुरवठा **विनामूल्य तत्वावर** करण्यात येत असल्याने **शेतक-यांकडून कोणतीही रक्कम वसुल करु नये.**

३) मिनीकीट्स बियाणे प्राप्त झाल्यानंतर त्याचा तपशील खालील प्रपत्रात आयुक्तालयास सादर करावा.

| अ.क्र. | पीक/ वाण | मिनिकीट संख्या | | प्राप्त दिनांक | पॅकेज ऑफ प्रॅक्टीसेस घडीपत्रीका प्राप्त (संख्या) | बीजप्रक्रीया कल्चर पॅकेट्स प्राप्त (संख्या) | मिनिकीट वाटप (संख्या) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लक्षांक | प्राप्त | | | | |
| | | | | | | | |

४) मिनीकीट बियाणे नव्याने प्रचलीत करावयाच्या वाणांची क्षेत्रीय चाचणी घेण्याच्या उद्देशाने दिले जात असल्याने त्याची स्थानिक प्रचलीत वाणांशी तुलना करणे बंधनकारक आहे. त्यादृष्टीने जेवढ्या क्षेत्रावर मिनिकीट बियाणाची पेरणी केली जाईल तेवढयाच क्षेत्रावर "कंट्रोल प्लॉट" म्हणून स्थानिक वाणाची पेरणी करुन त्याचा तुलनात्मक तपशील नोंदविणे बंधनकारक आहे. त्यासाठी पेरणी ते काढणी पर्यंत सर्व निरिक्षणे संबंधीत कृषि सहाय्यकाने नोंदवून प्राप्त उत्पादन व उत्पादकतेचा तपशील खालील प्रपत्रात हंगाम संपताच आयुक्तालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

| Supplying Agency | Crop/ variety | Minikits (Nos) | | Performance(Yield in Kg/ha.) | | | | | Seed Produced from Minikits | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Allocated | Received | Minikit Plot yield | Control Plot variety | Control Plot yield | % (+/-) | Remarks | Minikit Variety | Qty (Qtls) |
| | | | | | | | | | | |

५) पुरवठादार संस्थेकडुन बियाणे मिनीकीट्स प्राप्त झाल्यांनतर नियोजनानुसार तालुका स्तरावर पोच कराव्यात व त्यासाठी येणारा खर्च योजनांतर्गत संकीर्ण बाबीखाली करावा

६) बियाणे मिनीकीट्स साध्यांचा शेतकरीनिहाय तपशील, फोटो , इ. जिल्हास्तरावर जतन करावा.

२) बिजोत्पादन व बियाणे वितरण घटक

२.१ पायाभूत बियाणे उत्पादन कार्यक्रम : (केंद्र ६० टक्के : राज्य ४० टक्के) (जिल्हास्तर)

**अ) अनुदानास पात्रता:** पायाभूत बियाणे उत्पादनासाठी मागील दहा वर्षात राज्यासाठी अधिसूचीत झालेल्या वाणांच्या उत्पादीत बियाणे मात्रेस अनुदान अनुज्ञेय राहील.

**ब) अनुदान मर्यादा:** मागील दहा वर्षात राज्यासाठी अधिसुचित झालेल्या वाणांचे उत्पादीत पायाभूत बियाण्यासाठी उत्पादित बियाणाचे प्रमाणात किंवा उच्चतम मर्यादा रु.२५००/- प्रति क्विंटल प्रमाणे उपलब्ध निधीचे मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.

**क) लाभार्थी:** महाबीज, कृषि विद्यापीठे, नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट, कृषि विज्ञान केंद्र, कृषि विज्ञान मंडळे या संस्था पात्र ठरतील.

**ड) आवश्यक कागदपत्रे:** संबंधीत संस्थांनी अनुदान मागणीचा प्रस्ताव सादर करताना उत्पादित केलेल्या पायाभूत बियाणाबाबत बीज प्रमाणिकरण यंत्रणेने मुक्त केलेल्या पायाभूत बियाणे अहवालासह जि.अ.कृ.अ. यांना **खरीपासाठी डिसेंबर अखेर पर्यत व रब्बीसाठी फेब्रुवारी अखेरपर्यंत प्रस्ताव सादर करावेत.**

तालुका बीज गुणन केंद्रावर पायाभूत बियाणे उत्पादनाचा कार्यक्रम राबविण्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्तरावरुन नियोजन करुन पायाभूत बियाणे उत्पादनासाठी लागणाऱ्या मुलभूत बियाण्याची वाणनिहाय मागणी तात्काळ कृषि विद्यापिठांकडे नोंदवावी. तालुका बीज गुणन केंद्रावर किती क्षेत्रावर पायाभूत बियाणे उत्पादनाचा कार्यक्रम राबविला आहे याची माहिती पेरणी होताच कृषि आयुक्तालयास कळवावी व उपलब्ध होणा-या पायाभुत बियाण्याच्या मात्रेनुसार आवश्यकतेनुरुप निधी मागणी आयुक्तालयाकडे कळवावी, त्याप्रमाणे अनुदान वर्ग करण्यात येईल. वेळेत मागणी न नोंदविल्यास त्याचा विचार करणे शक्य होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अनुदान संबंधित उत्पादक संस्थेस जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्तरावरुन PFMS द्वारे थेट संबंधीतांचे राष्ट्रीयकृत बँक खात्यात जमा /अदा केली जाईल. केंद्र शासनाने मंजुर केलेल्या कार्यक्रमाच्या व निधी उपलब्धतेच्या मर्यादेतच कार्यक्रम राबविणे क्रमप्राप्त ठरते. त्यासाठी संबंधित संस्थांनी बिजोत्पादन कार्यक्रमाची नोंदणी करताच त्याबाबत संबंधित जि.अ.कृ.अ. यांना अर्ज करून आगावू कल्पना द्यावी. विहीत कालावधी मर्यादेत प्राप्त प्रस्तावांचा उपलब्ध निधीच्या मर्यादेतच विचार करून उपलब्ध निधी पेक्षा जास्त प्रकरणे असल्यास उच्चतम अनुदान मर्यादेचे अधीन राहून समप्रमाणात लाभ सर्व संबंधितांना द्यावा. पुढील आर्थिक वर्षात कोणतीही प्रलंबीत मागणी अनुज्ञेय राहणार नाही, हे स्पष्ट करावे. बियाणे पुरवठा संस्थांच्या तपशीलानुसार पायाभूत बिजोत्पादन लक्षांक निर्धारीत केले आहेत. तथापी, प्रत्यक्षात स्थानिक परिस्थितीनुरुप त्यात काही अंशी बदल झाल्यास विभागाचा आढावा घेवून सदर निधी संबंधीत जिल्ह्यांना विभागीय स्तरावरुन फेर वितरीत करावा .

२.२ प्रमाणित बियाणे उत्पादन कार्यक्रम: (केंद्र ६० टक्के : राज्य ४० टक्के) (जिल्हास्तर)

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्ह्यातील प्रमाणित बिजोत्पादन कार्यक्रमाद्वारे उत्पादित बियाणाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**अ) अनुदानास पात्रता:** मागील दहा वर्षात राज्यासाठी अधिसूचीत झालेल्या वाणांच्या व केवळ राज्यांतर्गत उत्पादीत प्रमाणित बियाणासाठी अनुदान अनुज्ञेय राहील.

**ब) अनुदान मर्यादा:** उपलब्ध निधी मर्यादेत **जिल्ह्यात एकूण उत्पादीत प्रमाणित बियाण्यासाठी समप्रमाणात** किंवा उच्चतम रु.२५००/- प्रति क्विंटल मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.

**क) लाभार्थी:** नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट, कृषि विज्ञान केंद्र, कृषि विज्ञान मंडळ, शेतकऱ्यांचे स्वयंसहाय्य गट/महिला स्वयंसहाय्य गट यांना प्राधान्य द्यावे

**ड) आवश्यक कागदपत्रे:** संबंधीत संस्थांनी अनुदान मागणीचा प्रस्ताव सादर करताना उत्पादित केलेल्या प्रमाणित बियाणाबाबत महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणेने मुक्त केलेल्या प्रमाणित बियाणे अहवालासह **जि.अ.कृ.अ. यांना खरीपासाठी डिसेंबर अखेर पर्यत व रब्बीसाठी फेब्रुवारी अखेरपर्यंत प्रस्ताव सादर करावेत.**

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्हयातील गळीतधान्य पिकांचे पीकनिहाय लागणारे प्रमाणित बियाणे व वाण बदलाचे प्रमाण विचारात घेवून कृषि विद्यापीठाचे शास्त्रज्ञ व बीज प्रमाणीकरण यंत्रणा यांच्या सल्ल्याने नव्याने अधिसूचित वाणांच्या बिजोत्पादनाचे नियोजन करावे. त्यासाठी लागणा-या पायाभूत बियाणाची मागणी संबंधित संस्थांकडे नोंदवावी. तसेच, पुढील दोन वर्षासाठी प्रमाणित बिजोत्पादनाचे नियोजन करताना लागणा-या मूलभूत/पायाभूत बियाणाची आगावू मागणी संबंधित संस्थांकडे नोंदवावी, जेणेकरुन लागणारे बियाणे तालुका बीजगुणन केंद्र व विद्यापीठ प्रक्षेत्रावर तयार करता येईल.

बिजोत्पादन कार्यक्रमाचे नियोजन करताना उत्पादीत बियाण्याचे प्रमाणीकरण व प्रक्रिया या दोन्ही बाबीचे नियोजन करणे अत्यंत महत्वाचे आहे. प्रक्रियेसाठी किती बियाणे उपलब्ध होईल याचा अंदाज घेऊन त्यासाठी सुविधा कोणत्या केंद्रावर उपलब्ध आहेत, हे पहावे व उत्पादीत झालेल्या सर्व बियाणावर प्रक्रिया केली जाईल असे नियोजन करावे.

बिजोत्पादन कार्यक्रमांअंतर्गत सहभागी संस्था व शेतकऱ्यांना आवश्यक ते सर्व तांत्रिक ज्ञानाविषयी प्रशिक्षण उपविभागीय कृषि अधिकारी यांनी बीज प्रमाणीकरण यंत्रणेच्या सहाय्याने आयोजीत करावे. ता.बि.के. वरिल बीज प्रक्रिया सयंत्रावर बीजप्रक्रिया करण्याकरीता संबंधित ता.कृ.अ.यांनी बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे अर्ज करावा व बियाणे प्रक्रिया करावी.

अभियानांतर्गत मागील तीन वर्षाचे साध्य विचारात घेऊन व बियाणे पुरवठा संस्थांच्या तपशीलानुसार प्रमाणित बिजोत्पादन लक्षांक निर्धारीत केले आहेत. तथापी, प्रत्यक्षात स्थानिक परिस्थितीनुरुप त्यात काही अंशी बदल होवू शकतो. तसे झाल्यास वि.कृ.स.सं. यांनी विभागाचा आढावा घेवून विभागीय स्तरावरुन गरजेनुरूप संबंधीत जिल्ह्यांना निधी फेरवितरीत करावा व अतिरिक्त निधीची मागणी असल्यास आयुक्तालयास कळवावे, निधी उपलब्धतेच्या अधीन राहून त्याबाबत विचार केला जाईल.

**पायाभूत व प्रमाणित बियाणे उत्पादन अनुदान अदायगीची कार्यपध्दती:**

१. याद्वारे शेतक-यांना विहित वयोमर्यादेतील नवीन वाणाचे प्रमाणित बियाणे उपलब्ध होईल, हा हेतू आहे.
२. संबंधीत संस्था नोंदणीकृत असल्याबाबतचे प्रमाणपत्र घ्यावे व त्यांनी बियाणे उत्पादनासाठी बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे कार्यक्रम नोंदविल्याची खात्री करावी.
३. विहित वयोमर्यादेतील अधिसुचित वाण व बीज प्रमाणिकरण यंत्रणेचे मुक्तता अहवालानुसार प्रत्यक्षात मुक्त केलेले बियाणे अनुदानास पात्र ठरेल.
४. सन २०२१-२२ मध्ये बीज प्रमाणिकरण यंत्रणेकडे नोंदणीकृत कार्यक्रमातून सन २०२२-२३ साठी उत्पादीत पायाभूत व प्रमाणित बियाणास अनुदान अनुदेय राहील. सदर तपशीलाची संबंधित यंत्रणेकडून खात्री करावी.
५. संस्थेने स्वत:चे प्रक्षेत्रावर बिजोत्पादन कार्यक्रम घेतला असल्यास अनुदान संबंधीत संस्थेच्या बँक खात्यावर जमा करावे.
६. संस्थेने बिजोत्पादन कार्यक्रम शेतक-यांच्या शेतावर घेतला असल्यास अशा प्रकरणी केंद्र शासनाच्या सुचनेनुसार ७५ टक्के अनुदान संबंधित शेतक-याच्या आधार संलग्न बॅन्क खात्यावर संस्थेने जमा करावे व उर्वरीत २५ टक्के रक्कम नोंदणी शुक्ल, बियाणे प्रक्रिया इत्यादी पोटी संस्थेने स्वत: कडे ठेवावी.
७. उत्पादित बियाण्यास अनुदान अदायगी केंद्र/ राज्य शासनाने त्या वर्षासाठी उपलब्ध करून दिलेल्या आर्थिक अनुदान मर्यादेचे अधीन राहून केली जाईल.
८. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्राप्त देयके विचारात घेऊन अनुदानाची अदायगी पुरवठादार संस्थांना प्रवर्गनिहाय करावी.
९. सदर घटकाचे प्रभावी सनियंत्रणाची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांची राहील.

**२.३ <u>प्रमाणित बियाणे वितरण:</u>** (केंद्र ६० टक्के : राज्य ४० टक्के) (जिल्हास्तर)

**अ) अनुदानास पात्रता:** अभियानांतर्गत गळीतधान्य पिकाच्या मागील १५ वर्षात राज्यासाठी अधिसूचीत झालेल्या सुधारीत वाणांच्या प्रमाणित बियाणाचे अनुदानीत दराने वितरण केले जाईल. या घटकाचा लाभ प्रति लाभार्थी जास्तीत जास्त ५ हेक्टर मर्यादेपर्यंत अनुज्ञेय राहील.

**ब) अनुदान मर्यादा**: पात्र वाणांकरीता किंमतीच्या ५० टक्के उच्चतम मर्यादा **रु. ४०००/- प्रति क्विंटल** मर्यादेत मुळस्त्रोत अनुदान अनुज्ञेय आहे. **प्रत्यक्ष विक्री किंमत विचारात घेता उपलब्ध अनुदान निधीतून अतिरिक्त भौतिक लक्षांक, आर्थिक साध्य करण्यास हरकत नाही.**

- राअसुअ गळीतधान्य पिके अंतर्गत प्रमाणित बियाणे वितरण हि बाब MahaDBT **पोर्टल** द्वारे राबवावयाची आहे.
- जिल्हानिहाय, पीकनिहाय वितरीत करावयाच्या प्रमाणित बियाण्यांचा तपशील सोबत **परिशिष्ट १** मध्ये सहपत्रीत करण्यात येत आहे. सदर घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी **महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, एचआयएल, कृभको, कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्रे व नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या/ संस्था** यांच्याबरोबर समन्वय ठेवून लक्षांकाप्रमाणे संबंधित तालुक्यामध्ये बियाणे वेळेत वितरीत केले जाईल याबाबत स्थानिक पातळीवर नियोजन व अंमलबजावणी करावी.
- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी लक्षांकनिहाय व पीकनिहाय **वाणांचा पूर्वानुभव विचारात घेवून राज्यासाठी शिफारस केलेल्या व स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुरूप कृषि हवामानास योग्य बियाण्यांची** मागणी पुरवठादार संस्थांना तात्काळ द्यावी. बियाणे पुरवठादार संस्थांनी त्यांचे वितरकांमार्फत प्रमाणित बियाणे वाटप करावयाचे आहे.
- प्रमाणित बियाणे वितरण अंतर्गत आवश्यक बियाण्याचा तालुकानिहाय पुरवठा करणेबाबत संबंधित बियाणे पुरवठादार संस्थांना सूचना देण्यात याव्यात. तसेच शेतकऱ्यांना वेळीच बियाणे उपलब्ध होईल यासाठी सनियंत्रण करावे.

- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी **तालुकानिहाय व प्रवर्गनिहाय** निश्चित केलेल्या लक्षांकानुसार पुरवठादार संस्थांनी त्या तालुक्यातील त्यांच्या अधिकृत वितरकांकडे प्रमाणित बियाणे उपलब्ध करुन द्यावे. वाणनिहाय व वितरकनिहाय किती बियाणे उपलब्ध करुन देण्यात आले आहे याची माहिति संबधीत तालुका कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना विनाविलंब उपलब्ध करून द्यावी.
- खरीप व रब्बी हंगामात एकूण बियाणे आवश्यकतेच्या किमान २० टक्के पर्यंत केंद्रीय बियाणे पुरवठादार संस्थांना लक्षांक देण्यात यावेत. सदरहू संस्थांकडे पुरेशा प्रमाणात बियाणे उपलब्ध न झाल्यास इतर शासकीय संस्थांकडे मागणी नोंदविण्यात यावी.
- जिल्हा व्यवस्थापक, महाबीज व इतर बियाणे पुरवठादार संस्थांच्या समन्वयाने वितरकनिहाय पुरवठा केलेले बियाणे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्राप्त करून घ्यावे. सोडतीमध्ये निवड झालेल्या शेतकरी संख्येनुसार वितरण करावयाच्या परमिट/ परवान्याबाबत तालुका/ वितरकनिहाय सूक्ष्म नियोजन करावे.
- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तालुका/ वितरकनिहाय केलेले नियोजन संबंधित तालुका कृषि अधिकारी यांना उपलब्ध करून द्यावे.
- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्हासाठी आवश्यक परमीट/ परवाने संबंधित बियाणे पुरवठादार संस्थांकडून उपलब्ध करून घेऊन नियोजनाप्रमाणे संबंधित तालुका कृषि अधिकारी यांना उपलब्ध करून द्यावे.
- तालुका कृषि अधिकारी यांनी तालुक्यातील लाभार्थी निवड यादी पोर्टलवर उपलब्ध करून घ्यावी व सदरील गावनिहाय यादी संबंधित कृषि सहाय्यकास उपलब्ध करून द्यावी.
- तालुका कृषि अधिकारी यांनी शेतकरी संख्येनुसार व नजीकचे वितरक विचारात घेऊन कृषि सहाय्यकाकडे शेतकऱ्यांना वाटपासाठी परमीट/ परवाने उपलब्ध करून द्यावे. ज्या वितरकाकडून बियाणे उचल करावयाचे आहे त्याची यादी व उचल करावयाचे बियाणे याचा तपशील उपलब्ध करून द्यावा. संबंधित कृषि सहाय्यकाने लाभार्थ्याशी समन्वय ठेवून शेतकऱ्याच्या क्षेत्राची व प्रवर्गाची खात्री करून लाभार्थी शेतकऱ्यास परमिट वितरीत करावे.
- वितरकांनी दर्शनी भागावर राष्ट्रीय खाद्य तेल अभियान अंतर्गत प्रमाणित बियाणे अनुदानावर उपलब्ध असल्याचा फलक लावावा. तसेच, वाणनिहाय दर, अनुदान व अनुदान वजा जाता पॅकींगनिहाय येणारी किंमत याची माहिती संबंधित वितरकाने फलकावर प्रदर्शित करणे आवश्यक आहे.
- संबधित वितरकांनी अनुदान वजा जाता येणारी किंमत लाभार्थी शेतकऱ्यांकडून घेऊन शेतकऱ्यांना बियाणे वितरीत करावे. **कृषि विभागामार्फत कोणत्याही परीस्थितीत शेतकऱ्याकडुन अनुदान वजा जाता रक्कम वसुल केली जाणार नाही, याची पुरवठादार संस्थांनी नोंद घ्यावी. लाभार्थी हिश्श्याची रक्कम शेतकऱ्यांकडून वसुल करण्याची जबाबदारी पुरवठादार संस्थांच्या वितरकांची राहिल.**
- संबंधित शेतकऱ्याने सदरील परमिट वितरकाकडे जमा करून अनुदानाची रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम अदा केल्याची पावती घेऊन बियाणे ताब्यात घ्यावे.
- महाबीज व इतर बियाणे पुरवठा संस्थांनी बियाणे वितरण पूर्ण झाल्यानंतर प्रवर्गनिहाय लाभार्थ्यांच्या परवाना व पावतीनिहाय याद्या आपल्या वितरकाकडून प्राप्त करून घेऊन संबंधित तालुका कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना उपलब्ध करून द्याव्यात. तालुका कृषि अधिकारी यांनी याद्यांची छाननी करून एकूण लाभार्थ्यांपैकी १० टक्के लाभार्थ्यांची रॅण्डम पद्धतीने तपासणी करून त्याचा अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावा.
- वितरीत केलेल्या बियाण्याची खातरजमा करण्यासाठी संबंधित वितरकाने प्रवर्गनिहाय लाभार्थी याद्या तालुका कृषि अधिकारी यांचेकडे वेळेवर सादर कराव्यात. तालुका कृषि अधिकारी व बियाणे पुरवठादार संस्थांकडून संयुक्त बियाणे वितरण अहवाल प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय कृषि अधिकारी यांनी बियाणे वितरण प्रमाणपत्र जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास पाठवावे. सदर वितरण प्रमाणपत्राच्या आधारे जिल्हास्तरावरुन संबधित पुरवठादार संस्थांना अनुदान वितरीत करण्यात यावे .
- बियाणे पुरवठादार संस्थेने जिल्ह्यातील सर्व वितरकांकडून प्राप्त झालेल्या लाभार्थी याद्या व प्रवर्गनिहाय अनुदान मागणीसाठीची देयके जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावीत.

- बियाणे वितरण कार्यक्रमाचे वेळोवेळी जिल्हास्तरारून सनियंत्रण करावे. शेतकऱ्यांना वेळेत बियाणे उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून दिलेल्या लक्षांकानुसार बियाणे पुरवठादार संस्था वेळेत बियाणे उपलब्ध करून देऊ शकत नसल्यास त्यांचा उर्वरीत लक्षांक इतर बियाणे पुरवठादार संस्थाना देण्यात यावा.
- **विहित केलेल्या प्रमाणानुसार अनुसूचित जाती/ जमाती व इतर प्राधान्यक्रमाच्या लाभार्थी शेतकऱ्यांना लाभ पोहचेल याची दक्षता घ्यावी.** बियाणे वितरणाचा लाभार्थी प्रवर्गनिहाय तपशील संबंधित संस्थांनी ताकृअ/ जिअकृअ यांना देयकासोबत पाठवावा, जेणेकरून लाभार्थी प्रवर्गनिहाय निधी खर्ची टाकता येवू शकेल.
- शेतकऱ्यांना बियाणे घेण्यासाठी जास्त अंतर जावे लागणार नाही या दृष्टिने जास्तीत जास्त वितरकांकडे बियाणे उपलब्ध होईल याची दक्षता बियाणे पुरवठादार संस्था व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी घ्यावी.
- खरीप व रब्बी हंगामात लाभार्थीनिहाय वितरण, वितरकाची साठा नोंदवही व विक्री बिलांची तपासणी संबंधित ता.कृ.अ. यांनी वेळोवेळी करावी.
- बियाणे पुरवठादार संस्थांकडून वितरकांकडे बियाणे प्राप्त झाल्यानंतर गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनी लॉट निहाय नमुने घेऊन शासकीय बीज परीक्षण प्रयोगशाळेकडून तपासून घ्यावेत. गुणवत्ता तपासणीत नमुना अप्रमाणित घोषित झाल्यास त्या लॉटची देयके अदा करू नयेत. तसेच, पुरवठा केलेल्या बियाण्याच्या गुणवत्तेबाबत काही तक्रारी निर्माण झाल्यास जिल्हा/तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीद्वारे विहित पद्धतीनुसार प्रत्यक्ष क्षेत्रास भेटी देवून निरीक्षणे नोंदवावीत. समितीने शास्त्रोक्त पद्धतीने सुस्पष्ट निष्कर्ष नोंदवावेत. अप्रमाणित नमुन्याबाबत तसेच, तक्रार निवारणाचे अनुषंगाने पुढील कार्यवाही संचालक, निविष्ठा व गुणनियंत्रण यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशांनुसार करावी. तक्रारीबाबत बियाणे अधिनियम १९६६, बियाणे नियम १९६८ च्या भाग ९ मधील नियम २३-A नुसार कार्यवाही करावी.
- सदर घटकाचे प्रभावी सनियंत्रणाची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांची राहील.
- वितरीत निधीतून बियाणे घटकाची अदायगी विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून प्रथम प्राधान्याने करावी.
- वितरीत बियाण्याची अनुदान अदायगी केंद्र/ राज्य शासनाने त्या वर्षासाठी उपलब्ध आर्थिक मर्यादेत करावी.

**ब) <u>तंत्रज्ञान प्रसार</u>** (केंद्र ६० टक्के : राज्य ४० टक्के) ( जिल्हास्तर )

**१. <u>पीक प्रात्यक्षिके</u>:** अद्यावत विकसित तंत्रज्ञानाचा प्रसार करणे हा प्रात्यक्षिकांचा उद्देश आहे. संदर्भीय दि.२७/४/२०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ४.१ नुसार सुधारीत तंत्रज्ञानावर आधारीत समूह गट प्रात्याक्षिके राबवावीत. **<u>सोयाबीन व करडई पिकांच्या प्रात्यक्षिके हि शेतक-यांची शेतीशाळा (FFS) या कार्यक्रमाशी निगडीत राबवावयाची आहेत</u>.** प्रात्यक्षिकांसाठी निविष्ठा घटक बियाणे, बिज प्रक्रिया, जैविक खते, किटकनाशके, इत्यादी घटकांसाठी अनुदान अनुज्ञेय राहील. **<u>केंद्र शासनाच्या सूचनांनुसार रासायनिक खतांना अनुदान अनुज्ञेय राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी</u>.**

- पीक प्रात्यक्षिके या बाबीची अंमलबजावणी करताना MahaDBT कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात यावा.
- पीक प्रात्यक्षिकासाठी MahaDBT पोर्टलवर एका गावामध्ये १० हेक्टर/ २५ शेतकऱ्यांची नोंद झाल्याशिवाय लॉटरीमध्ये त्या गावाचा समावेश होऊ शकणार नाही. या अनुषंगाने जिल्ह्यांनी तालुकानिहाय वितरीत केलेल्या लक्षांकानुसार MahaDBT पोर्टलवर शेतकरी नोंदणीची कार्यवाही पूर्ण करावी.
- पीक प्रात्यक्षिके १० हे. क्षेत्राच्या समूह प्रात्यक्षिक (क्लस्टर) धर्तीवर घेण्यात यावीत.
- क्रॉपसॅप अंतर्गत घेण्यात येणाऱ्या शेतकरी शेतीशाळा ( FFS ) संलग्न प्रात्यक्षिके राबविण्यात यावीत.
- क्रॉपसॅप अंतर्गत निरीक्षणासाठी प्रात्यक्षिक समूहातील (क्लस्टर) प्लॉटची निवड करण्यात यावी.
- पीक प्रात्यक्षिकांतर्गत निवडलेल्या समूहातील शेतकऱ्यांच्या क्षेत्रावर काटेकोर पेरणी करावी. पेरणीसाठी यांत्रिकी पद्धत, बीबीएफ पद्धत, टोकन पद्धत इ. चा अवलंब करावा.
- पीक प्रात्यक्षिकांतर्गत निवडलेल्या समूहामध्ये बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात यावा.
- पीक प्रात्यक्षिकांतर्गत निवडलेल्या समूहातील शेतकऱ्यांना पीक स्पर्धेमध्ये सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करावे.

- **पीक प्रात्यक्षिकांतर्गत शेतकऱ्यांना १० वर्षाच्या आतील वाणांचे बियाणे अनुदानावर पुरवठा करावयाचे आहे. यासाठी प्रमाणित बियाणे वितरण बाबीप्रमाणेच कार्यपद्धती लागू राहील.** त्यानुसार पीक प्रात्यक्षिकांतर्गत सोयाबीन पिकासाठी किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. ४०००/- प्रती क्विंटल, भूईमुग पिकासाठी किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. ६०००/- प्रती क्विंटल यापैकी किमानप्रमाणे व इतर पिकाकरिता बियाणे किमतीच्या ५० टक्केप्रमाणे अनुदान देय राहील.
- प्रात्यक्षिक पिकाची तालुक्याची सरासरी उत्पादकता, त्या पिकांचे उच्चतम उत्पादन घेतलेल्या शेतकऱ्यांची उत्पादकता आणि त्या पिकांची विद्यापीठाने ठरवून दिलेली उत्पादन क्षमता (Yield potential) यात मोठी तफावत आहे. ही तफावत कमी करून पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी स्थानिक कृषि हवामान पद्धतीचा विचार करून संबंधित कृषि विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक जिल्ह्यातील प्रमुख पिकांसाठी कृषि विद्यापीठांच्या शास्त्रज्ञांनी (संचालक संशोधन/ संचालक विस्तार) आधुनिक तंत्रज्ञान निश्चित करून विभागीय कृषि सहसंचालकांना द्यावे.
- पीक प्रात्यक्षिकासाठी निवडण्यात आलेल्या शेतकऱ्यांना वाटप केलेल्या मृद आरोग्य पत्रिकेआधारे अथवा ज्या ठिकाणी मृद आरोग्य पत्रिका अद्याप उपलब्ध नसेल अशा ठिकाणी मृद तपासणी करून त्या अहवालाप्रमाणे लागणाऱ्या निविष्ठा (पॅकेज) निश्चित कराव्यात. सदर निविष्ठा संबंधित कृषि विद्यापीठांचे शास्त्रज्ञ व संबंधित विभागीय कृषि सहसंचालकांनी निश्चित कराव्यात.
- सर्व विभागीय कृषि सहसंचालकांनी या कामी कृषि विद्यापीठ, कृषि विभागाचे क्षेत्रीय अधिकारी व अन्य संस्थांशी समन्वय साधून प्रात्यक्षिकांचे पॅकेज निश्चित करून घ्यावे. पॅकेज निश्चितीसाठी त्या-त्या पिकांचे उच्चतम उत्पादन घेतलेल्या शेतकऱ्यांची देखील मदत घेण्यात यावी. निर्धारित पॅकेजनुसार पीक प्रात्यक्षिकाची अंमलबजावणी करावी.
- **प्रात्यक्षिकासाठी निर्धारित केलेल्या पॅकेजनुसार आवश्यक अनुदान विचारात घेता प्रती हेक्टरी होणाऱ्या संभाव्य बचतीतून उपलब्ध निधी मर्यादेत अतिरिक्त पीक प्रात्यक्षिके घेण्यात यावीत.** त्याबाबत पँकेज ठरविताना संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांनी निर्णय घ्यावा व मान्यता प्रदान करावी.
- **एखाद्या जिल्ह्यात स्थानिक परिस्थितीनुसार प्रात्यक्षिकात पीक बदल करणे क्रमप्राप्त असल्यास विहित वयोमर्यादेतील प्रमाणित बियाणे उपलब्धता विचारात घेवून त्यास संबंधित वि.कृ.स.सं. यांनी मान्यता द्यावी.** त्यासाठी वेळोवेळी आयुक्तालयास प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता राहणार नाही, याची नोंद घ्यावी. स्थानिक परिस्थितीनुरूप खरीप व रब्बी हंगामातील पीक प्रात्यक्षिकांचे नियोजन विभागस्तरावर करावे.
- एकूण १० हे. क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांचे समूह/ गटामार्फत प्रात्यक्षिकांची अंमलबजावणी करण्यात यावी. **गटामध्ये जे शेतकरी शासनाने ठरवून दिलेल्या तंत्रज्ञानाप्रमाणे पीक प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यास तयार असतील अशाच शेतकरी समूहांना लाभार्थी म्हणून निवडण्यात यावे.** प्रात्यक्षिक क्लस्टर मधील सर्व शेतकऱ्यांचा गटामध्ये समावेश असणे बंधनकारक राहील. प्रती शेतकरी कमीत कमी ०.४० हेक्टर क्षेत्रावर प्रात्यक्षिकाचे आयोजन करावे.
- पीक प्रात्यक्षिकासाठी मागील १० वर्षाच्या आतील अधिसूचित झालेल्या व राज्यासाठी शिफारस केलेल्या तसेच, प्रत्यक्ष क्षेत्रिय पुर्वानुभवानुसार त्या-त्या कृषि हवामान क्षेत्रासाठी योग्य वाणांचे प्रमाणित बियाणे संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी निवड करून वापरणे बंधनकारक राहील.
- प्रात्यक्षिकासाठी लागणाऱ्या बियाण्याची मागणी प्राधान्याने महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, कृषि विद्यापीठे, कृभको, हिंदुस्तान इंसेक्टीसाईड ली. व नाफेड यांचेकडे करावी.
- जैविक खते, सूक्ष्ममूलद्रव्ये या निविष्ठा वेळीच उपलब्ध होणेकरीता आवश्यक मागणी खरीप व रब्बी हंगाम सुरु होण्यापूर्वी शासकीय संस्थाना कळविण्यात यावी, जेणेकरून शासन निर्णयाप्रमाणे लाभार्थ्यांना सदर निविष्ठांचा वेळेत पुरवठा होईल. जैविक खते/ औषधांबाबत उपरोक्त **संदर्भ क्र. ४** नुसार कार्यवाही करण्यात यावी.
- या निविष्ठांव्यतिरिक्त अन्य निविष्ठांची लाभार्थी शेतकरी गटाने त्यांच्या पसंतीने खुल्या बाजारातून खरेदी करावी व त्यानंतर खरेदी केलेल्या निविष्ठांचा पीक प्रात्यक्षिकासाठीच वापर केल्याची खात्री करून तंत्रज्ञान प्रात्यक्षिकांच्या मंजूर मापदंडानुसार **गटातील शेतकऱ्यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात अनुदान थेट जमा करण्यात यावे.**

❖ **एकात्मिक कीड व्यवस्थापन:** प्रात्यक्षिकांच्या पिकावर येणारे संभाव्य किड व रोग, त्यांचा जीवनक्रम आणि एकात्मिक पद्धतीने पीक संरक्षण बाबत सखोल माहिती लाभार्थ्यास देण्यात यावी. पिकाच्या वाढीच्या विविध अवस्थेमध्ये येणाऱ्या किडींचे सर्वेक्षण करण्याबाबत लाभार्थ्यास प्रशिक्षित करावे. यासाठी क्रॉपसॅप अंतर्गत नियुक्त केलेल्या किडरोग सर्वेक्षकांची

मदत घेण्यात यावी. किडरोग सर्वेक्षणाच्या आधारे दिलेल्या सल्ल्यानुसार किडनाशकांचा वापर करण्याबाबत लाभार्थ्यास प्रवृत्त करावे. यासाठी केंद्रीय कीटकनाशक मंडळाच्या लेबल क्लेम व कृषि विद्यापीठाने पीकनिहाय व किड/ रोगनिहाय केलेल्या शिफारशींचा अवलंब करावा.

❖ **<u>एकात्मिक अन्नद्रव्ये व्यवस्थापन</u>:** प्रात्यक्षिकांच्या पिकाकरिता लागणारे पोषक अन्नद्रव्ये याबाबत सखोल माहिती लाभार्थ्यास देण्यात यावी. पिकाच्या वाढीच्या विविध अवस्थेमध्ये आवश्यक अन्नद्रव्ये (भूसुधारके, विद्राव्य खते, सूक्ष्म मूलद्रव्ये, गंधक, इ) वापर करण्याबाबत लाभार्थ्यास प्रशिक्षित/ प्रवृत्त करावे. यासाठी कृषि विद्यापीठाने पीकनिहाय दिलेल्या शिफारशींचा अवलंब करावा.

❖ **पीक प्रात्यक्षिकाचा उत्पादन अहवाल -**

- प्रत्येक प्रात्यक्षिकाशेजारी गुणात्मक तुलनेसाठी शेतकऱ्यांनी स्थानिक पध्दतीने घेतलेल्या तेवढ्याच क्षेत्राचा “कन्ट्रोल प्लॉट” निवडावा. दोन्ही क्षेत्राच्या पिकाच्या पेरणीपासून कालक्रमानुसार वापरलेल्या निविष्ठांच्या नोंदी बरोबरच त्यासाठी आलेल्या खर्चाची तारीखवार नोंद व दोन्ही क्षेत्रातून आलेल्या उत्पादनाची सांख्यिकी पध्दतीने पीक कापणी प्रयोग घेऊन विश्लेषणात्मक नोंदी **खालील प्रपत्रात** ठेवाव्यात.

**<u>पीक प्रात्यक्षिकाचा उत्पादन अहवाल</u>**

योजना : -----प्रात्यक्षिकाचा हेतू:---- कृषि सहाय्यकाचे नाव:-----प्रात्यक्षिकाचे गाव/तालुका:-----सहभागी शेतकरी संख्या:

| शेतकऱ्याचे नाव | प्रात्यक्षिक प्लॉटमधील एकुण खर्च | पारंपारीक पध्दतीचे प्लॉटमधील एकुण खर्च | प्रात्यक्षिक प्लॉटमधील उत्पादन (क्विंटल/हे) | पारंपारीक पध्दतीचे प्लॉटमधील उत्पादन (क्विंटल/हे) | बाजारभावानुसार मिळालेले उत्पन्न (₹/हे) | | प्रात्यक्षिक प्लॉटमधील मिळालेले निव्वळ वाढीव उत्पन्न (₹/हे) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रात्यक्षिक प्लॉटमधील | पारंपारीक पध्दतीने | |
| | | | | | | | |

❖ **पीक प्रात्यक्षिकांतर्गत पीक कापणी प्रयोग–**

➢ प्रत्येक पीक प्रात्यक्षिक क्लस्टरमधून रँडम पद्धतीने एक प्लॉट निवडून शेतकरी गटाच्या उपस्थितीत सांख्यिकी पध्दतीने पीक कापणी प्रयोग घेणे बंधनकारक राहील. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील प्रत्येक तालुक्यामध्ये व तालुका कृषि अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील प्रत्येक मंडळामध्ये किमान एक पीक कापणी प्रयोगास हजर राहून सनियंत्रण करणे बंधनकारक राहील.

➢ पीक कापणी प्रयोगाद्वारे साध्य करण्यात आलेल्या उत्पादकतेचा अहवाल संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांनी संकलीत करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावा. जिल्ह्याचा संकलीत अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी **प्रपत्र १** मध्ये विभागास सादर करावा व त्याची प्रत कृषि आयुक्तालयास सादर करावी. विभागीय कृषि सहसंचालक यांनी विभागाचा संकलीत अहवाल आयुक्तालयास सादर करावा.

➢ प्रात्यक्षिके राबविण्याची संपूर्ण जबाबदारी कृषि सहाय्यकांची राहील. गांवनिहाय संकलित केलेल्या पीक कापणी निरिक्षण अहवालाची एकत्रित नोंद मंडळस्तरावर एका स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे मंडळ कृषि अधिकाऱ्यांना बंधनकारक राहील.

➢ कृषि सहाय्यकांनी वर्षनिहाय नोंदवही **प्रपत्र २** नुसार ठेवावी. याबाबत तालुका कृषि अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची प्रशासकीय जबाबदारी राहील.

➢ सर्व प्रात्यक्षिकांसाठी संबंधीत कृषि सहाय्यक यांनी प्रात्यक्षिकांचे सर्व अभिलेख ठेवणे बंधनकारक असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळोवेळी प्रात्यक्षिकांना भेटी देवून मार्गदर्शन करावे.

➢ पिक कापणीनंतर १५ दिवसामध्ये पिक कापणीचा अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**पीक प्रात्यक्षिक अंमलबजावणीबाबत सर्वसाधारण सूचना -**

- पीक प्रात्यक्षिक क्लस्टरसाठी निवड केलेल्या क्षेत्राचे मंडळ कृषि अधिकारी यांनी पायाभूत सर्वेक्षण पूर्ण करून क्लस्टरमधील उत्पादकतेच्या लक्षांकांसह प्रकल्प आराखडा तयार करावा. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्याची योग्यायोग्यता विचारात घेऊन यथाशिघ्र मान्यता प्रदान करावी. निश्चित केलेले प्रात्यक्षिकांचे तालुकानिहाय उत्पादकता लक्षांक राअसुअ कक्षास कळविण्यात यावेत.
- पायाभूत सर्वेक्षणाबाबतची माहिती http://www.nfsm.gov.in/mis या लिंकवर तात्काळ भरून अद्ययावत करण्याची जबाबदारी मंडळ कृषि अधिकारी यांची राहील.
- ज्या शेतकरी गटाकडे प्रात्यक्षिके घेण्यात आलेली आहेत त्या शेतकरी गटाची निवड याच अभियानांतर्गत पुन्हा इतर पिकासाठी शक्यतो करू नये, जेणेकरून जास्तीत जास्त शेतक-यांना लाभ देणे सुलभ होईल.
- अनुसूचित जाती/ जमाती, महिला व अपंग लाभार्थ्यांना विहित प्रमाणानुसार लाभ देणे बंधनकारक राहील.
- पीक प्रात्यक्षिक क्षेत्रातील पिकांची पूर्वमशागत, बीजप्रक्रिया, पेरणी/ लावणी, आंतरमशागत, सिंचन व्यवस्था, विशेष तंत्रांचा वापर, पीक संरक्षण, काढणी व मळणी या सर्व कामांचे नियोजन लाभार्थी गटास तयार करून द्यावे.
- पीक प्रात्यक्षिकासाठी आवश्यक सर्व निविष्ठांविषयी शेतकऱ्यांना अवगत करावे, निविष्ठांची खरेदी उत्पादक गटाने वेळेत करणे बंधनकारक राहील. गटामार्फत खरेदी करण्यात आलेल्या तसेच लाभार्थीनिहाय वाटप केलेल्या निविष्ठांच्या नोंदी कृषि सहाय्यकाने प्रात्यक्षिक नोंदवहीमध्ये घ्याव्यात.
- प्रात्यक्षिकांतर्गत प्रती हेक्टरी आर्थिक मर्यादेपेक्षा अधिकचा खर्च झाल्यास सदर खर्च संबधित लाभार्थी गटाने करावा.
- प्राप्त निविष्ठांचा वापर नियोजित प्रात्याक्षिकासाठीच केला जाईल व गैरवापर होणार नाही याबाबत खातरजमा करावी.
- लाभार्थ्यांची यादी ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर जाहीर करावी तसेच केंद्र व राज्य शासनाच्या वेबसाईटवर भरावी.
- प्रात्यक्षिक प्लॉट शेजारी पारंपारीक पध्दतीवर आधारीत तुलनात्मक प्लॉट घेण्यात यावा.
- प्रात्यक्षिके शक्यतो रस्त्यालगत तसेच, संबंधित गावातील जमिनीचा प्रकार/ सुपीकता यांचे प्रातिनिधिक असावीत. प्रात्यक्षिकाचा फलक रस्त्याच्या कडेला प्लॉटशेजारी दर्शनी भागात लावावा व त्यावर खालील माहिती नमूद करावी.

| राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (गळीतधान्य) अंतर्गत ---------- पीक प्रात्यक्षिक | | |
|---|---|---|
| १) समाविष्ठ गावांचे नाव: | २) सहभागी शेतकरी संख्या: | ३) पीक व वाण: |
| ४) प्रात्यक्षिकाचा प्रकार: | ५) खत मात्रा: | ६) जैविक खते मात्रा: |
| ७) सुक्ष्म मुलद्रव्ये मात्राः | ८) बियाण्याचे प्रमाण व पेरणीचे अंतर: | ९) पेरणीची तारीख: |
| १०) शेतकरी गट प्रमुख व कृषि सहाय्यकाचे नांव व भ्रमणध्वनी संपर्क क्रमांक: | | |
| **११) गतवर्षी आलेले उत्पन्न (क्विंटल प्रती हेक्टर):** | **१२) चालू वर्षी आलेले उत्पन्न (क्विंटल प्रती हेक्टर):** | |

- पीक प्रात्यक्षिकासाठीच्या निविष्ठा वेळेपूर्वी लाभार्थी गटास उपलब्ध होतील असे नियोजन मंडळ कृषि अधिकारी यांनी करावे.
- लाभार्थी गटाने पीकनिहाय वितरण केलेल्या व वापरलेल्या निविष्ठांच्या नोंदी नोंदवहीत ठेवाव्यात.
- अभियानांतर्गत प्रात्यक्षिकासाठी वितरीत करावयाच्या निविष्ठा संदर्भात मागणी, तपासणी व देयक अदायगी या अनुषंगाने संचालक, निविष्ठा व गुण नियंत्रण यांनी निर्गमित केलेल्या अद्ययावत मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
- केंद्र शासनाच्या धोरणानुसार Krishi Kisan Application च्या माध्यमातून पीक प्रात्यक्षिकाचे Geo-Tagging करणे अनिवार्य आहे. त्याप्रमाणे अभियानांतर्गत आयोजित करावयाच्या पीक प्रात्यक्षिकांचे संपूर्णतः Geo-Tagging करावे.

## २. आय.पी.एम.-शेतकरी शेतीशाळा : (६० टक्के : राज्य ४० टक्के) ( जिल्हास्तर )

अभियानांतर्गत जिल्हानिहाय आयोजित करावयाच्या सोयाबीन व करडई पिकांच्या शेती शाळाचे लक्षांक सोबतच्या परिशिष्ट क्र. ०१ मध्ये दर्शविले आहेत. शेतकरी शेतीशाळा आयोजनाबाबत **"क्रॉपसॅप सलंग्न शेतीशाळा"** विषयक मार्गदर्शक सूचना आयुक्तालयाच्या संदर्भीय दि. ०६/०५/२०२२ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. अभियानातर्गत शेतीशाळा आयोजित करताना सदर सुचनांचे पालन करावे. जिल्हानिहाय दिलेल्या लक्षांकानुसार ज्या शेतकऱ्यांची पिक प्रात्यक्षीकांकरिता निवड करण्यात आली आहे अशा शेतकऱ्यांना /शेतकरी गटांना प्राधान्याने प्रशिक्षीत करावे. रक्कम रु. १२५००/- प्रती शेतकरी शेतीशाळा (FFS) प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. आयोजित केलेल्या प्रशिक्षण सत्रांबाबत जिल्ह्याचा सविस्तर अहवाल कृषी आयुक्तालयास पाठवावा. अहवालामध्ये प्रशिक्षणाचे वेळापत्रक, निवडलेले विषय, प्रशिक्षण साहित्य (घडीपत्रिका, माहितीपत्रक, पुस्तिका इ.), तज्ञ मार्गदर्शकांची नावे, संपर्क क्रमांक व ई-मेल पत्ते, सहभागी प्रशिक्षणार्थींची संख्या, फोटो आणि बातम्या यांचा समावेश असावा.

**३. <u>प्रशिक्षणे</u>:** (केंद्र ६० टक्के : राज्य ४० टक्के) ( जिल्हास्तर )

**३.१ <u>शेतकरी प्रशिक्षण</u> :** शेतक-यांना अद्ययावत तंत्रज्ञान अवगत करुन कौशल्यवृध्दी वाढ करणे हा प्रशिक्षणाचा हेतू आहे. प्रशिक्षणाचे जिल्हानिहाय व पीकनिहाय लक्षांक **परिशिष्ठ १** मध्ये दिले आहेत. **हा घटक FFS शी संलग्न राहील.**

*३.२* <u>विस्तार अधिकारी/कर्मचारी/निविष्ठा विक्रते यांचे प्रशिक्षण</u>: विस्तार अधिकाऱ्यांचे ज्ञान व कौशल्यवृध्दी करुन भविष्यात त्यांना तज्ञ प्रशिक्षक (मास्टर ट्रेनर) बनविण्यासाठी प्रशिक्षित करणे हा प्रशिक्षणाचा हेतु आहे. त्यानुसार जिल्हा स्तरावर जि.अ.कृ.अ. यांनी नियोजन व कार्यवाही करावी. सन २०२२-२३ साठी प्रशिक्षणाचा सविस्तर कार्यक्रम सोबत सहपत्रीत केला आहे.

**क) <u>उत्पादन वाढीसाठी निविष्ठा पुरवठा घटक</u> (केंद्र *६०* टक्के : राज्य *४०* टक्के) (जिल्हास्तर)**

कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांतर्गत अनुदानावर वाटप करावयाच्या कृषि निविष्ठांसंदर्भात थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) च्या अनुषंगाने संदर्भीय दि. १९/४/२०१७ व दि. १२/९/२०१७ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सविस्तर सुचनानुसार अंमलबजावणी करावी. तसेच, याबाबत कृषि संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण) यांचेकडून वेळोवेळी निर्गमित केल्या जाणा-या सुचना लागू राहतील. सदर बाब शेतीशाळा संलग्न राबवावी.

मृद आरोग्य पत्रिका व कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार उत्पादन खर्चात बचत करून गरजेनुरूप अन्नद्रव्ये पुरवठा करण्याच्या दृष्टीने एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे. एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनामध्ये जिप्सम व जैविक खते या बाबींचा समावेश होतो. सदर घटकाची अंमलबजावणी किंमतीच्या ५० टक्के किंवा प्रति हेक्टर मंजूर मापदंडानुसार जे कमी असेल ते याप्रमाणे अनुदानावर करावयाची आहे. सदर अंमलबजावणी समूह/ गट स्वरुपात करावी, जेणेकरून सदर घटकाची परिणामकारकता इतर शेतकऱ्यांना समजावून देणे सोयीचे होईल. **सदर घटकांतर्गत प्राप्त लक्षांक खरीप, रब्बी आणि उन्हाळी हंगामासाठी असून जिल्ह्यातील गळीतधान्य पिकांखालील क्षेत्र विचारात घेऊन या घटकाचे हंगामनिहाय व पीकनिहाय नियोजन करावे.**

**१) <u>जिप्सम /सल्फर ९०% पावडर (FCO ग्रेड) या भूसुधारकाचा पुरवठा:</u>**

जिल्ह्याच्या सुपीकता निर्देशांकानुसार ज्या तालुक्यात सूक्ष्ममुलद्रव्यांची कमतरता आहे अशा तालुक्यातील शेतकरी गटांची निवड करून त्यांना सूक्ष्ममूलद्रव्याचे महत्त्व पटवून द्यावे.

- जिप्सम/ सल्फर ९०% पावडर (FCO ग्रेड) या भूसुधारकांच्या वापरासाठी किंमतीच्या ५० टक्के किंवा ₹ ७५०/- प्रति हेक्टर यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. त्यासाठी लाभार्थी शेतकरी गटाने खुल्या बाजारातून त्यांच्या पसंतीने खरेदी करावी व त्यानंतर गटातील शेतकऱ्यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात अनुदान थेट जमा करण्यात यावे.
- लाभार्थी गटाने पीकनिहाय वापरलेल्या भूसुधारकांच्या नोंदी व संबंधित पिकांचे आलेले उत्पादन याबाबतचा तपशील कृषि सहाय्यकांनी नोंद वहीत ठेवावा. तसेच तुलनात्मक प्लॉटच्याही उत्पादन नोंदी ठेवाव्यात आणि इतर शेतकऱ्यांना भूसुधारकांचे महत्त्व पटवून द्यावे.

**२. <u>जैविक खते पुरवठा:</u>**

- कृषि विभागाच्या जैविक प्रयोगशाळांमार्फत विविध पीक गटास आवश्यक द्रवरूप जैविक खते/ जैविक खते संघ ( liquid consortia ) तयार करण्यात येत आहे. सदर खतांची बीजप्रक्रिया केल्यास उत्पादन खर्चात बचत होऊन पिकांच्या उत्पादकतेत वाढ होते. खत नियंत्रण आदेश, १९८५ मध्ये द्रवरूप जीवाणू संघ (liquid consortia) यामध्ये नत्र स्थिरीकरण करणारे जीवाणू, स्फुरद विरघळविणारे जीवाणू व जस्त विरघळविणारे जीवाणू यापैकी कमीत कमी दोन किंवा अधिक जीवाणूंचा समावेश असतो, अशी जैविक खते म्हणजेच द्रवरूप जीवाणू संघ (liquid consortia). एकच जीवाणू असणारे जैविक खत व दोन किंवा अधिक जीवाणू असणारे जीवाणू संघ यांची तुलना केली असता द्रवरूप जीवाणू संघ (liquid consortia) हा तुलनेने स्वस्त, वापरण्यास सोपा, वाहतूक खर्च कमी, बीज प्रक्रियेसाठी विशेष कौशल्याची आवश्यकता नसलेला व एकात्मिक अन्नद्रव्य पुरविण्याचा उद्देश साध्य करणारा आहे. यापूर्वी प्रामुख्याने घनरूप जैविक खतांचा वापर केला जात होता. परंतु त्यापेक्षा द्रवरूप जीवाणू खते अधिक फायदेशीर आहेत. एकच जीवाणू असलेले द्रवरूप/ घनरूप जैविक खते वापरण्यापेक्षा तीनही मुख्य अन्नद्रव्य उपलब्ध करून देणारे जैविक खत वापरणे फायदेशीर ठरते. उपरोक्त तीन जीवाणूंचा समावेश असणारे जैविक खत हे पिकानुसार उपलब्ध करून दिले जाऊ शकते. याबाबत शेतकऱ्यांना माहिती देण्यात यावी. संबंधित गटामार्फत द्रवरूप जीवाणू संघ (liquid consortia) प्रथम पूर्ण किंमत देवून खरेदी करावीत व तद्नंतर गटातील शेतकऱ्यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात अनुदान थेट जमा करण्यात यावे. **शेतकरी गटाने जैविक खतांची खरेदी प्रथम प्राधान्याने शासकीय प्रयोगशाळा, कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्रे या प्राधान्यक्रमाने करावी**.

- शेतकऱ्यांना खुल्या बाजारातून जैविक खते खरेदी करावयाची असल्यास किंमतीच्या ५० टक्के किंवा ₹ ३००/- प्रति हेक्टर यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. त्यासाठी लाभार्थी शेतकरी गटाने खुल्या बाजारातून त्यांच्या पसंतीने खरेदी करावी व त्यानंतर याबाबत खात्री करून गटातील शेतकऱ्यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात अनुदान थेट जमा करण्यात यावे.
- लाभार्थी गटाने पीकनिहाय वापरलेल्या जैविक खतांच्या नोंदी व संबंधित पिकांचे आलेले उत्पादन याबाबतचा तपशील कृषि सहाय्यकांनी नोंदवहीत ठेवावा. तसेच तुलनात्मक प्लॉटच्याही उत्पादन नोंदी ठेवाव्यात आणि इतर शेतकऱ्यांना जैविक खतांचे महत्त्व पटवून द्यावे.
- संदर्भीय शा.नि.दि.१९/४/२०१७ व दि. १२/९/२०१७ नुसार जैविक खते पुरवठा महाबीज, शासकीय संस्था, कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्र इ. कडून केला जाणार असल्याने त्याबाबतीत थेट लाभ हस्तंतरणाचे माध्यमातून अनुदान देण्याचा प्रश्न उदभवत नाही, त्यासाठी शेतक-यांना मार्गदर्शन करावे. प्राधान्याने संबंधित प्रयोगशाळेकडे अपेक्षित मागणी कळवावी, जेणेकरून वेळेवर उत्पादन व पुरवठा शक्य होईल

३. <u>पिक संरक्षण औषधे व तणनाशके पुरवठा:</u>

३.१ <u>पीक संरक्षणासाठी कीटकनाशके / कीडनाशके पुरवठा</u> -

**या बाबीसाठी ५० टक्के मर्यादेत प्रती हेक्टर रु. ५००/- पर्यंत अनुदान** अनुज्ञेय **आहे. याबाबत क्रॉपसॅप योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी.**

हवामान बदलामुळे विविध कीडरोगांचा प्रादुर्भाव होत असल्याने कीटक / कीडनाशकांवरील खर्चामध्ये वाढ होत चालली आहे. पर्यायाने अन्नधान्य पिकांच्या उत्पादन खर्चामध्ये वाढ होत आहे. कीड नियंत्रणासाठी रासायनिक कीडनाशकांचा वापर अनिवार्य असल्याने सदर घटकाची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे आवश्यक आहे.

- निवडलेल्या शेतकऱ्यांच्या पिकांवरील किड व रोगांचे मागील २-३ वर्षाच्या प्रादुर्भावाबाबत माहिती घेण्यात यावी, या माहितीनुसार महत्त्वाच्या किड व रोगांचे एकात्मिक कीड व्यवस्थापनाच्या अनुषंगाने वेळीच पीक संरक्षण औषधांचा वापर करणेबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात यावे. यासाठी कीड व रोग सर्वेक्षणाच्या अहवालाचा वापर करण्यात यावा.
- पीक संरक्षण औषधांसाठी किंमतीच्या ५० टक्के किंवा प्रति हेक्टरी ₹ ५००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय आहे. त्यासाठी लाभार्थी शेतकरी गटाने कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार खुल्या बाजारातून त्यांच्या पसंतीने लेबल क्लेम असलेल्या पीक संरक्षण औषधांची खरेदी करावी. त्यानंतर गटातील शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट अनुदान जमा करण्यात यावे.
- लाभार्थी गटाने पिकनिहाय किडींचा झालेला प्रादुर्भाव व त्यासाठी वापरलेल्या रासायनिक कीडनाशकांच्या नोंदी व संबंधित पिकांचे आलेले उत्पादन याबाबतचा तपशील कृषि सहाय्यकांनी नोंदवहीत ठेवावा. तसेच तुलनात्मक प्लॉटच्याही उत्पादन नोंदी ठेवाव्यात आणि इतर शेतकऱ्यांना कीड व्यवस्थापनाचे महत्त्व पटवून द्यावे.
- कोणत्याही परिस्थितीत मंजूर आर्थिक/ भौतिक कार्यक्रमापेक्षा जास्त मागणी किंवा शिफारस न केलेल्या कीडनाशकांचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी.
- जैविक किटकनाशकांचे उत्पादन शासकीय प्रयोगशाळा, कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्र यांचेकडून केले जाते. शेतक-यांनी त्यांचेकडून खरेदी केल्यास उपरोल्लेखित शा.नि.नुसार थेट लाभ हस्तंतरणाचे माध्यमातून अनुदान देण्याचा प्रश्न उदभवत नाही,

३.२ <u>तणनाशके</u> -

ऐन हंगामात मजूर उपलब्धतेच्या समस्येमुळे व वाढत्या मजुरी दरांमुळे तण नियंत्रणावरील खर्च वाढत असून अन्नधान्य पिकांच्या उत्पादन खर्चात वाढ होत आहे. तण नियंत्रणासाठी रासायनिक तणनाशकांचा वापर अनिवार्य असल्यास सदर घटकाची अंमलबजावणी शास्त्रोक्त पद्धतीने व प्रभावीपणे करावी.

- तणनाशकांच्या किंमतीच्या ५० टक्के किंवा ₹ ५००/- प्रति हेक्टर यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. त्यासाठी लाभार्थी शेतकरी गटाने खुल्या बाजारातून त्यांच्या पसंतीने लेबल क्लेम असलेल्या तणनाशकांची खरेदी करावी व त्यानंतर खात्री करून गटातील शेतकऱ्यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात अनुदान थेट जमा करण्यात यावे.

- तणनाशके ही पिकांसाठी अतिसंवेदनशील असल्याने लेबलक्लेमवर नमूद केलेल्या वापराबाबतच्या सूचनांप्रमाणे व तज्ञांच्या सल्ल्यानेच तणनाशकांचा वापर करण्याची सर्वतोपरी दक्षता घेण्यात यावी.
- लाभार्थी गटाने पीकनिहाय तणांच्या नियंत्रणासाठी वापरलेल्या तणनाशकांच्या नोंदी व मजूर खर्चामध्ये झालेली बचत आणि संबंधित पिकांचे आलेले उत्पादन याबाबतचा तपशील कृषि सहाय्यकांनी नोंदवहीत ठेवावा. तसेच तुलनात्मक प्लॉटच्याही उत्पादन नोंदी ठेवाव्यात आणि इतर शेतकऱ्यांना तणव्यवस्थापनाचे महत्त्व पटवून द्यावे.
- कोणत्याही परिस्थितीत मंजूर आर्थिक/ भौतिक कार्यक्रमापेक्षा जास्त मागणी तसेच, शिफारस न केलेल्या तणनाशकांचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३.३ <u>जैविक कीड नियंत्रण (एन.पी.व्ही.) पुरवठा</u>:

- हेलीकोव्हर्पा/स्पोडोप्टेरा अळीच्या जैविक नियंत्रणासाठी ही बाब समाविष्ठ केली आहे. स्थानिक परिस्थीतीनुसार कृषि विद्यापीठाच्या शिफारशीप्रमाणे पीक संरक्षणासाठी एन.पी.व्ही. खरेदीबाबत शेतक-यांना मार्गदर्शन करावे. यासाठी किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५००/ हेक्टर मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. अनुदान थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बॅक खात्यात जमा करावे. सदर बाब शेतीशाळा संलग्न राबवावी.

**४. <u>सुधारीत कृषि औजारे व सिंचन सुविधा</u> :** कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजनांतर्गत अनुदानावर वाटप करावयाच्या सुधारीत कृषि औजारांसंदर्भात संदर्भीय दि. २७/४/२०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ४.५ नुसार व थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) योजना राबविण्याच्या अनुषंगाने संदर्भीय शासन निर्णय दि. २१/१/२०१७ अन्वये निर्गमित सविस्तर सुचनानुसार अंमलबजावणी करावी. याबाबत कृषि संचालक (नि.व गु.नि.) यांचेकडून निर्गमित होणा-या सुचना लागू राहतील.

राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (गळीतधान्य) अंतर्गत सुधारित कृषि औजारे पुरवठा व सिंचन सुविधा हि बाब MahaDBT पोर्टलद्वारे राबविण्यात येत आहे. अभियानांतर्गत समाविष्ट पिकांच्या उत्पादन खर्चात बचत करून उत्पादन वाढ करण्यासाठी उपयुक्त असलेल्या यंत्रे/ कृषि औजारांचे वापरास प्रोत्साहन देण्यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे आवश्यक आहे. स्थानिक परिस्थितीनुसार मागणी असलेल्या औजारांसाठी शेतकऱ्यांना MahaDBT पोर्टलद्वारे नोंदणी करणेबाबत जिल्हास्तरावरून व्यापक प्रमाणावर प्रसिद्धी देण्यात यावी. आधुनिक कृषि औजारे व यंत्रांबाबतची माहिती तसेच यंत्र चालविण्याबाबतचे कौशल्य इच्छुक शेतकऱ्यांना प्राप्त होण्यासाठी कृषि विज्ञान केंद्राचे सहकार्याने प्रशिक्षण व प्रात्यक्षिकाचे आयोजन करावे. राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (गळीतधान्य) **सन २०२२-२३ अंतर्गत जिल्हानिहाय पीकनिहाय मंजूर औजारांचा लक्षांक परिशिष्ट १ मध्ये सहपत्रीत केला आहे.**

**औजारे घटकासाठी अनुदानाची रक्कम थेट लाभार्थींच्या बँक खात्यावर जमा करण्याबाबत कार्यपद्धती ( MahaDBT )**

उपरोक्त **संदर्भ २** वरील शासन निर्णयानुसार कृषि विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अनुदानावर वाटप करावयाच्या कृषि औजारांच्या संदर्भात थेट लाभ हस्तांतरण योजना, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या कलम ३ अन्वये लोकसेवा म्हणून अधिसूचित करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय खाद्य तेल अभियान गळीतधान्य अंतर्गत सुधारित कृषि औजारे पुरवठा हि बाब **संदर्भ क्र. ९** वरील शासन परिपत्रकानुसार MahaDBT पोर्टलद्वारे राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने कृषि औजारासंदर्भात कार्यवाही करणे बंधनकारक आहे. याबाबत उपरोक्त **संदर्भ क्र २ ते ९** वरील शासन निर्णय/परिपत्रकाचे पालन करावे.

**राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (गळीतधान्य) अंतर्गत औजारे घटकाच्या अंमलबजावणीसाठी कार्यपद्धती पुढीलप्रमाणे राहील.**

- सुधारित कृषि औजारे व सिंचन साधने व सुविधा घटकांसाठी MahaDBT पोर्टलद्वारे अर्ज करण्याबाबत जिल्हा व तालुकास्तरावर प्रचार/ प्रसिद्धी करण्यात यावी.
- **अर्जदारांची नोदणी व आधार प्रमाणीकरण** - सर्व इच्छुक शेतकऱ्यांना **MahaDBT** पोर्टलच्या संकेत स्थळावर जाऊन स्वतःची नोंदणी करावी लागेल तसेच आपल्या आधार क्रमांकाचे प्रमाणीकरण करावे लागेल. आधार प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे तथापि, हि प्रक्रिया शेतकऱ्यांना एकदाच करावी लागणार आहे.
- कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतर्गत अनेक बाबींकरिता अर्थसहाय्य करण्यात येते या प्रणालीद्वारे शेतकऱ्यांना एका अर्जाद्वारे सर्व औजारांसाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

- राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (गळीतधान्य) अंतर्गत दर्शविलेली औजारे संचालक ( निवगुनि ) यांनी वेळोवेळी घालून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार (कृषि यांत्रिकीकरण उप अभियानाच्या [SMAM] मार्गदर्शक सूचनांनुसार) शेतकऱ्यांना अनुदानावर पुरवठा करण्यात यावीत.
- पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी सिंचन साधनांतर्गत पंपसंच व पाईप या घटकांसाठी लाभार्थी निवडताना ज्या शेतकऱ्यांनी यापुर्वी विविध केंद्र/ राज्य पुरस्कृत योजनेत शेततळ्याचा/ विहारींचा लाभ घेतलेला आहे अशा शेतकऱ्यांची तसेच महावितरणच्या प्रतिक्षा यादीतील शेतकऱ्यांची प्राधान्याने निवड करावी.
- सिंचनासाठी **आय.एस.आय. मार्क पाईप्सची** लाभार्थ्यांनी पूर्वसंमती घेऊन त्यांच्या पसंतीने खरेदी करावी. लाभधारकांकडे सिंचनासाठी स्त्रोत उपलब्ध असल्याची खात्री करावी. किंमतीच्या ५० टक्के किंवा पाईपच्या प्रकारानुसार खालीलप्रमाणे उच्चतम मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. या घटकासाठी प्रती लाभार्थी एकूण लाभाची उच्चतम मर्यादा रु. १५०००/- राहील.

| अ. क्र. | पाईपचा प्रकार | उच्चतम अनुदान मर्यादा/मिटर |
|---|---|---|
| १ | एचडीपीई पाईप्स | रु. ५०/- |
| २ | पीव्हीसी पाइप्स | रु. ३५/- |
| ३ | एचडीपीई लॅमिनेटेड वोव्हन ले फ्लॅट ट्युब्ज पाइप्ससाठी | रु. २०/- |

- **कृषि औजारे घटकांतर्गत मंजूर औजारांमध्ये स्थानिक मागणीचे अनुषंगाने अंतर्गत घटक बदल मंजूर आर्थिक तरतुदीचे मर्यादेत विभागीय कृषि सहसंचालक यांचे मान्यतेने करता येतील**.

राज्यातील सोयाबीन हे प्रमुख गळीतधान्य पिक असून ते बहुतांश कोरडवाहू क्षेत्रात घेतले जाते. पिकाच्या वाढीच्या अवस्थेत एक संरक्षित सिंचन मिळाल्यास उत्पादनात मोठी वाढ होते. त्या दृष्टीने सन २०२२-२३ मध्ये मुलस्थानी जलसंधारणास विशेष महत्व देवून कार्यवाही करावयाची आहे. त्या दृष्टीने प्राधान्याने **रुंद-वरंबा-सरी** (Broad Bed Furrow) पध्दतीने सोयाबीन पिकाची पेरणी करण्याचे दृष्टीने शेतक-यांना प्रोत्साहित करून तसे नियोजन करावे.

<u>**सुधारीत कृषि औजारे:**</u>

| औजारांचा प्रकार | उच्चतम अनुदान मर्यादा | उच्चतम अनुदान मर्यादा | |
|---|---|---|---|
| | | अ.जा/अ.ज./अल्प/सिंमांत/महीला प्रवर्ग | सर्वसाधारण प्रवर्ग |
| मनुष्य चलित औजारे | रु. ०.१० लाख /औजार | औजारे किंमतीच्या ५० टक्के किंवा सदर औजारासाठी निर्धारित उच्चतम मर्यादेत | औजारे किंमतीच्या ४० टक्के किंवा सदर औजारासाठी निर्धारित उच्चतम मर्यादेत |
| ट्रॅक्टर चलित कृषि औजारे<br>Chisel Plough / Rotavator/ Seed Drill/Zero Till Seed cum Fertilizer Drill/ MultiCrop Planter/Zero Till Multi-Crop Planter/ Ridge furrow Planter/ Raised bed planter/ Power weeder/ Groundnut digger /Multi crop thresher/ Power Weeder | रु. ०.७५ लाख /औजार | औजारे किंमतीच्या ५० टक्के किंवा सदर औजारासाठी निर्धारित उच्चतम मर्यादेत | औजारे किंमतीच्या ४० टक्के किंवा सदर औजारासाठी निर्धारित उच्चतम मर्यादेत |

**टीप** - कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे अनुदाचा लाभ अनुज्ञेय राहील.

**ड) <u>फ्लेक्झी निधी घटक</u> (केंद्र ६० टक्के : राज्य ४० टक्के) (जिल्हास्तर)**

**१) तेलघाणा :**

- उत्पादित मालाच्या मूल्य वृद्धीसाठी छोटे तेलघाणे संयंत्र या बाबीचा अंतर्भाव करण्यात आला आहे.
- सदर घटकासाठी MahaDBT पोर्टलद्वारे अर्ज करण्याबाबत जिल्हा व तालुकास्तरावर प्रचार/ प्रसिद्धी करण्यात यावी.
- MahaDBT पोर्टलद्वारे निवडलेल्या लाभार्थ्याने छोटे तेलघाणे संयंत्र खरेदी केल्यानंतर व त्याची मोका तपासणी झाल्या नंतरच अनुदानाची देय रक्कम त्याच्या थेट आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात जमा करावी. .

- छोटे तेलघाणा सयंत्रासाठी कृषि यांत्रिकीकरण उप अभियान (SMAM) अंतर्गत घटक क्रमांक ३ बाबीखाली (कृषि यंत्रे औजारे खरेदीसाठी अर्थसहाय्य) नमूद केल्याप्रमाणे अ.जा./अ.ज./अल्प., अत्यल्प व महिला शेतकऱ्यांसाठी किमतीच्या ६० टक्के किंवा रु. १.८० लाख यापैकी जे कमी असेल ते व इतर शेतकऱ्यांना किमतीच्या ५० टक्के किंवा रु. १.५० लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय आहे.
- केंद्र शासनाच्या सूचनेनुसार CIPHET, लुधियाना व यासारख्या इतर केंद्रीय संस्थेने तपासणी केलेल्या Mini Oil Mill / Oil Expeller ची उत्पादकनिहाय तेलघाणा मॉडेलला सदरील अनुदान अनुज्ञेय राहील.

**२) <u>डीझेल / विद्युत चलित पंपसंच</u> :**

संरक्षित सिंचनासाठी पाणीसाठा उचलण्याकरीता अनुदानावर डीझेल / विद्युत चलित पंपसंच ही बाब अंतर्भूत केली आहे. सदर घटकाचा लाभ सिंचन सुविधा असलेल्या लाभार्थ्यांना प्राधान्याने द्यावा. आय.एस.आय. मार्क असलेल्या डीझेल/विद्युत पंपसंचाची लाभार्थ्यानी पूर्वसंमतीने त्यांच्या पसंतीनुसार खरेदी करावी. त्यासाठी किमतीच्या ५०% किंवा उच्चतम मर्यादा रु. १०००० /- प्रती पंपसंच यापैकी किमानप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. यासाठी महाडीबीटी कार्यपद्धती लागू राहील.

**३) <u>शेततळे निर्मीती</u>:**

गळीतधान्य लागवडीखालील क्षेत्राचा विचार करून तालुकानिहाय शेततळ्यांचा लक्षांक निश्चीत करावा. पिकास संरक्षित सिंचन देण्यासाठी शेततळे याबाबीचा अंतर्भाव केला आहे. यासाठी **"मागेल त्याला शेततळे"** या योजनेप्रमाणे कार्यपद्धती लागू राहील. यासाठी २०X२०X३ मी. व ३०X३०X३ मी. आकारमानाचे शेततळ्यासाठी "मागेल त्याला शेततळे" या योजनेच्या अद्ययावत असणाऱ्या मापदंडाप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील.

MahaDBT पोर्टलद्वारे निवडलेल्या लाभार्थ्यांना याबाबीचा लाभ देताना मोका तपासणीच्यावेळी मापन पुस्तिकेतील नोंदीप्रमाणे व अभियानाच्या मापदंडाप्रमाणे देय अनुदान संबधित लाभार्थ्याच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात जमा करावे.

कार्यान्वयीन यंत्रणा आणि लाभार्थी यांच्या जबादाऱ्या पुढीलप्रमाणे राहतील.

- **<u>कार्यान्वयीन यंत्रणेची जबाबदारी</u> :**

अ) निवड केलेल्या लाभार्थ्याला कृषि विभागाच्या इतर योजनेतुन शेततळेसाठी लाभ दिलेला नाही याची खात्री करावी.

ब) कृषि सेवक/कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक/मंडळ कृषि अधिकारी यांनी तांत्रीक निकषाप्रमाणे जागेची निवड करावी, कामाच्या पूर्वी लाभार्थ्यासह निवडलेल्या जागेचा फोटो व जागेचे अक्षांश, रेखांश नस्तीत नोंदवून जतन करावेत.

क) मंजूर आकारमानाप्रमाणे शेततळ्याची आखणी करुन द्यावी.

ड) खोदकामाच्या विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थ्यांस तांत्रिक मार्गदर्शन करावे.

इ) लाभधारकाने शेततळ्याचे काम पूर्ण झाल्याचे लेखी कळविल्यांनतर अनुज्ञेय अनुदान अदायगीसाठी शिफारस करण्यापुर्वी कृषि सेवक/कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षक यांनी प्रत्यक्ष मोजमापे व शेततळ्याचा लाभार्थ्यासह फोटो घेऊन नस्तीत जतन करावा.

ई) काम पूर्ण झाल्यावर अनुदानाची अनुज्ञेय रक्कम आधार नोंदणीकृत राष्ट्रीयकृत बँक खात्यावर जमा करावी.

प) शेततळ्यातील पाण्याचा संरक्षित सिंचनासाठी कार्यक्षम वापराकरिता लाभार्थ्यास गरजेनुसार सिंचन साधनांचा लाभ द्यावा.

फ) ता.कृ.अ.ने शेततळ्याचे लाभार्थीनिहाय, वर्षनिहाय, योजनानिहाय एकत्रित नोंदवही ठेवणे बंधनकारक राहील जेणेकरून लाभाची द्विरुक्ती होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी संबंधित तालुका कृषि अधिकारी यांची राहील.

ग) शेततळ्याचे Geotagging करणे बंधनकारक राहील.

- **<u>लाभार्थ्याची जबाबदारी</u> :**

अ) कृषि विभागाचे कृषि सेवक/कृषि सहाय्यक यांनी निश्चीत केलेल्या ठिकाणी शेततळे घेणे बंधनकारक राहील.

ब) कार्यारंभ आदेश मिळाल्यापासून शेततळ्याचे काम तीन महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक राहील.

क) लाभार्थ्यांनी स्वत:च्या आधार नोंदणीकृत राष्ट्रीयकृत बँक खात्याचे पासबुकचे पहिल्या पानाच्या छायांकीत प्रतीसह संबंधीत कृषि सहाय्यक यांचेकडे सादर करावी.

ड) मंजूर आकारमानाचे शेततळे खोदणे हे लाभार्थ्यास बंधनकारक राहील.

इ) शेततळ्याच्या बांधावर व पाण्याच्या प्रवाहाच्या भागामध्ये स्थानिक प्रजातीच्या वनस्पतीची लागवड करावी.

ई) शेततळ्याची निगा, दुरुस्ती, वेळोवेळी गाळ काढणे इ. जबाबदाऱ्या संबंधीत लाभधारकाची राहतील.

प) पावसाळ्यात शेततळ्यात गाळ येवून साचणार नाही याची लाभार्थ्याने व्यवस्था करावी..

फ) लाभार्थ्याच्या ७/१२ उताऱ्यावर शेततळ्याची योजनेसह नोंद घेणे बंधनकारक राहील.

ग) शेततळे पुर्ण झाल्यावर योजनेचा फलक लाभार्थ्याने लावणे बंधनकारक आहे.

घ) नैसर्गीक आपत्तीमुळे शेततळ्यास कोणत्याही प्रकारची हानी पोहोचल्यास नुकसान भरपाई अनुज्ञेय राहणार नाही.

**४) <u>गोदाम बांधकाम</u> :**

गळीतधान्य उत्पादनाच्या सुरक्षित साठवणुकीसाठी व मुल्य वृद्धीसाठी गोदाम सुविधा आवश्यक आहे. ज्या ठिकाणी गळीतधान्य पिके घेतली जातात तथापी गोदामाची व्यवस्था नाही अशा ठिकाणी गोदाम बांधकामासाठी लक्षांक देण्यात यावा. अभियानांतर्गत २५० मे.टन क्षमतेचे गोदाम बांधकाम करण्यासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा ₹ १२.५० लाख यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. सदर बाब बँक कर्जाशी निगडीत असून इच्छुक अर्जदाराने (शेतकरी उत्पादक संघ/कंपनी FPO/FPC) केंद्र शासनाच्या ग्रामीण भंडारण योजना/ नाबार्डच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बँकेकडे प्रकल्प सादर करावा. बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतर संबंधित अर्जदार कंपनी सदर बाबीच्या लाभास पात्र राहील. तालुका कृषि अधिकारी यांनी अशा अर्जदारांचे अर्ज पूर्वसंमतीकरिता जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे सादर करावेत. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी पूर्वसंमती दिल्यानंतर संबंधित लाभार्थ्यास बांधकाम सुरु करण्याबाबत कार्यारंभ आदेश द्यावेत. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर बँक प्रतिनिधी, तालुका कृषि अधिकारी व मंडळ कृषि अधिकारी यांच्या संयुक्त मोका तपासणी अहवालाच्या आधारे लाभार्थ्यास अनुज्ञेय होणारे अनुदान त्याच्या राष्ट्रीयकृत बँक कर्ज खात्यावर वर्ग करावे. दिलेल्या लक्षांकानुसार आर्थिक वर्षात गोदाम बांधकाम पूर्ण होण्याचे दृष्टीने वेळापत्रकानुसार अंमलबजावणी करावी.

- **<u>गोदाम बांधकामाबाबत करावयाची कार्यवाही :</u>**
  - i. लाभार्थी निवडीसाठी वर्तमानपत्रात व्यापक प्रसिद्धी देवून अर्ज मागवावेत.
  - ii. तालुका कृषि अधिकारी यांनी इच्छूक लाभार्थ्यांचे अर्ज म.रा. वखार महामंडळाच्या प्राधिकृत अधिकारी अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यता प्राप्त डिझाइन्स, स्पेसिफिकेशन्स व खर्चाच्या अंदाजपत्रकासह जि.अ.कृ.अ. यांना सादर करावेत.
  - iii. लाभार्थी निवड एप्रिल - मे महिन्यात करावी. लक्षांकाच्या तुलनेत जास्त अर्ज आल्यास सोडत पद्धतीने निवड करावी.
  - iv. वखार महामंडळाच्या तांत्रिक निकषाप्रमाणे लाभार्थ्याने जागेची निवड करावी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी गोदाम बांधकामापुर्वी जागेस भेट देऊन खात्री करावी व फोटोग्राप्स घ्यावेत.
  - v. शासनाच्या सर्व योजनामधून या बाबीसाठी एकाच योजनेचा एकदाच लाभ घेता येईल. **<u>लाभाची द्विरुक्ती होणार नाही</u>** याची जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी खात्री करावी. **एका बाबीवर दोन योजनेतून अनुदान घेता येणार नाही तसे आढळल्यास सदर बाब गंभीर समजून देणारा व घेणारा यांचेवर कडक कार्यवाही करण्यात येईल**.
  - vi. वखार महामंडळाच्या तांत्रिक निकषाप्रमाणे डिझाईन, स्पेसिफिकेशन, खर्चाचे अंदाज पत्रकाप्रमाणे बांधकाम आर्थिक वर्षात पूर्ण करणे बंधनकारक राहील. अपूर्ण बांधकामास पुढील आर्थिक वर्षात अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.
  - vii. अपूर्ण बांधकाम, मंजूर डिझाईन, स्पेसिफिकेशन मध्ये बदल करून बांधकाम केल्यास अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.
  - viii. गोदामाचा वापर शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेला कृषिमाल साठवणुकीसाठी शेतकऱ्यांना योग्य व माफक दरात करावा. याबाबत रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड हमीपत्र घ्यावे, गोदाम वापरामध्ये गैरवापर आढळल्यास अनुदानाची रक्कम व्याजासहीत वसुल केली जाईल, याचा स्पष्ट उल्लेख करावा.

ix. जि.अ.कृ.अ. यांनी गोदाम बांधकामास भेटी देऊन कामाची प्रत्यक्ष पाहणी करावी व फोटो घ्यावेत.
x. बांधकाम पुर्ण झाल्यानंतर पुर्तता अहवाल (*Completion Report*) व फोटो घ्यावेत.
xi. गोदामाच्या उद्देशाप्रमाणे त्याचा वापर अन्नधान्य सुरक्षित साठवणुकीसाठी करणे बंधनकारक राहील.
xii. अन्नधान्यांचे साठवणुक सुविधेअभावी नुकसान होऊ नये म्हणुन संबंधितांना कृषि विज्ञान केंद्रामार्फत प्रशिक्षण द्यावे.
xiii. गोदाम भाडे तत्त्वावर द्यावयाचे झाल्यास शेतकरी उत्पादक कंपनीने ता.कृ.अ.यांचे सल्ल्याने कार्यपध्दती ठरवावी.
xiv. अन्नधान्य साठवणुकीबाबतचा त्रैमासीक अहवाल, तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा.
xv. साठवलेल्या मालाची विक्री करण्यासाठी आत्मा/ पणन विभागाचे मार्गदर्शन घ्यावे.
xvi. गोदामासाठी अग्निशमन व्यवस्था आसावी व दर्शनी भिंतीवर खालीलप्रमाणे बोर्ड असावा.

महाराष्ट्र शासन

**राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (गळीतधान्य) वर्ष सन २०२२-२३**

शेतकरी उत्पादक कंपनीचे नाव:- ................................ बांधकाम पुर्ण झाल्याचा दिनांक: ..........

एकुण खर्च : रु. ............../- अनुदानाची रक्कमः रु. .............../-

xvii. गोदाम बांधकाम पुर्ण झाल्यानंतर तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी व बँकेच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त मोका तपासणी करावी आणि तद्नंतर जि.अ.कृ.अ. यांनी अनुदानाची रक्कम लाभधारकाचे गोदामासाठी घेतलेल्या कर्ज खात्यावर जमा करावी.
xviii. गोदामाचे बांधकामापूर्वी व बांधकामानंतर Geo tagging करणे बंधनकारक राहील.

**<u>इ) प्रकल्प व्यवस्थापन व संकीर्ण खर्च:</u>** (केंद्र ६० टक्के : राज्य ४० टक्के)

१) <u>राज्यस्तरीय व जिल्हा स्तरीय तांत्रिक सहाय्यक गट (Technical Support Group) :</u>

अभियानांतर्गत केवळ अभियान क्र. १ साठी कंत्राटी पध्दतीने ***<u>पूर्णत: हंगामी स्वरुपात</u>*** तांत्रीक सहाय्यकांच्या गटाची आयुक्तालय व जिल्हा स्तरावर नियुक्ती करावी. सन २०२२-२३ मध्ये जिल्हास्तरावर केवळ १ तंत्र सहाय्यकाची ११ महिन्याच्या कालावधीसाठी अथवा २ तंत्र सहाय्यकाची आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत ६ महिन्यासाठी पूर्णत: कंत्राटी तत्वावर नियुक्ती करावी. सोबतच्या प्रपत्रामध्ये तांत्रिक सहाय्यता गटांचे मानधनासाठी दिलेल्या आर्थिक कार्यक्रमाच्या मर्यादेतच मनुष्यबळाची नियुक्ती करावी. सदर पदांसाठी आवश्यक शैक्षणीक अर्हता, अनुभव, कालावधी, मासीक मानधन याबाबतचा तपशील खालील तक्त्यात दर्शविला आहे, त्यानुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील. केंद्र शासनाच्या सेवाकर विषयक Finance Act, १९९४; Chapter V; Section ६६D नुसार कृषि विस्तार सेवेसाठी सेवाकर (सर्व्हिस टॅक्स) लागू नाही. तसेच, **GST Council approved rate schedule for services मधील अनु. क्र. ४ (vi) नुसार कृषि विस्तार सेवांकरिता GST लागू नाही. त्यामुळे सदर अभियानांतर्गत तांत्रिक सहाय्यक गट नियुक्तीसाठी सेवा पुरवठादार संस्थेबरोबर करार करताना उपरोक्त नियमांचा उल्लेख करारमध्ये स्पष्टपणे करण्यात यावा. प्रकल्प व्यवस्थापन चमू अंतर्गत नियुक्त कर्मचारी ज्या प्रवर्गातील आहे त्यानुसार त्यांचे मानधन सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी वितरित केलेल्या निधीमधून अदा करावे.**

जिल्हास्तरावर कंत्राटी पध्दतीने तंत्र सहाय्यकांच्या नियुक्तीच्या दृष्टीने विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर विभागातील संबंधीत जिल्ह्यांसाठी आवश्यक संख्येनुरुप **खुल्या निविदा पध्दतीने नोंदणीकृत सेवा पुरवठादारांमार्फत** पात्र उमेदवारांची निवड करुन त्यांना जिल्ह्याच्या मुख्यालयी तात्काळ वर्ग करण्याची कार्यवाही करावी.

राज्य स्तरावरील **चार** पदांसाठी कंत्राटी तांत्रीक सहाय्यकांच्या नियुक्तीची प्रक्रीया विभागीय कृषि सहसंचालक, पुणे यांनी त्यांचेकडील प्रक्रीयेसोबतच राबवावी व त्यांच्या सेवा आयुक्तालयाकडे तात्काळ वर्ग कराव्यात. त्यांच्या मानधनाची अदायगी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, पुणे यांचे मार्फत केली जाईल. सदर प्रक्रीया पुर्णत: पारदर्शक पध्दतीने व संबंधीत सर्व कायद्यांचे अधिन राहून काटेकोरपणे करण्याची संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक यांनी दक्षता घ्यावी.

कंत्राटी तांत्रीक सहाय्यकांच्या नियुक्तीची स्तरनिहाय शैक्षनिक अहर्ता, अनुभव व मानधनाचा तपशील खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | पद / कालावधी | आवश्यक पात्रता /अटी | मासीक मानधन (रु.) | संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | तंत्र सहाय्यक (११ महीने) (राज्यस्तर) | कृषि विषयातील पदव्युत्तर पदवी व क्षेत्रिय स्तरावरील पिक व्यवस्थापन क्षेत्रातील प्राविण्य तसेच संगणकीय ज्ञान आवश्यक, संशोधन व विस्तार विषयातील अनुभवास प्राधान्य | एकत्रित मानधन ₹ ४००००/- + पूरक भत्ता ₹ २५००/- + दैनिक भत्ता ₹ १५० प्रमाणे (फक्त १० दिवसासाठी) | ४ |
| २ | तंत्र सहाय्यक (११ महिने) (जिल्हास्तर) | कृषी विषयातील पदवी व क्षेत्रीय पिक व्यवस्थापन क्षेत्रातील प्राविण्य तसेच संगणकीय ज्ञान आवश्यक, कृषी विषयातील पदवीधर उपलब्ध न झाल्यास शास्त्रातील पदवीधारकांचा विचार करावा. संशोधन व विस्तार विषयातील अनुभव असणाऱ्यास प्राधान्य. | एकत्रित मानधन ₹ ३००००/- + पूरक भत्ता ₹ १५००/- + दैनिक भत्ता ₹ १५० प्रमाणे (फक्त १० दिवसासाठी) | १९ |

**अभियान क्र.-३ (वृक्षजन्य तेलबिया) व विशेष अभियान (TRFA) बाबत संबंधीत जिल्ह्यांसाठी कंत्राटी तांत्रीक सहाय्यकांची नियुक्ती करु नये.**

जिल्हास्तरीय चमूमध्ये आवश्यकतेप्रमाणे १ किंवा २ तंत्र सहाय्यकांच्या सेवा घ्यावयाच्या असून त्यांच्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे राहतील.

- **तंत्र सहाय्यक १**
    १. मासिक प्रगती अहवाल सादर करणे. PFMS प्रणालीवर निधी व खर्चाचे सनियंत्रण करणे.
    २. MIS Online भरणे.
    ३. लाभधारकांची माहीती Online भरणे.
    ४. घटकनिहाय लाभार्थी याद्यांचे Excel sheet मध्ये संकलन करून सादर करणे.
    ५. जिल्हास्तरावरुन तालुकानिहाय व प्रकल्पनिहाय कार्यक्रमाचे सनियंत्रण करणे.
    ६. इतर
- **तंत्र सहाय्यक २**
